दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –३३ | गुरूवार, दि.०९ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-33 | Thursday, Dt.09 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# नवी मुंबई विमानतळ, मेट्रो तीनचा अंतिम टप्प्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारताच्या विकासाचे नवे इंजिन– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ विमानतळ नाही, तर महाराष्ट्र आणि भारताच्या आर्थिक विकासाचे नवे इंजिन ठरणार आहे. राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात एक टक्क्यांची वाढ करण्याची क्षमता या प्रकल्पात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन संपन्न झाले. या सोहळ्याला महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री किंजरापू राममोहन नायडू, वने मंत्री गणेश नाईक, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जपानचे राजदूत ओनो केइची, अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांच्यासह खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा स्वप्नपूर्तीचा दिवस आहे. जे प्रकल्प स्वप्नरूपात होते, गेली दहा वर्षे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ते आज वास्तवात उतरले आहेत. नवी मुंबई विमानतळाची संकल्पना १९९०च्या दशकात झाली असली, तरी अनेक वर्षांपासून ती केवळ कागदावरच होती. प्रधानमंत्री मोदी यांच्या 'प्रगती' उपक्रमाअंतर्गत या प्रकल्पाचा समावेश झाल्यानंतर सर्व आवश्यक परवाने मिळवण्यात यश येऊन कामाला वेग आला. हे विमानतळ दरवर्षी नऊ कोटी प्रवाशांची हाताळणी करू शकणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

विमानतळाबरोबरच अटल सेतू, ४० किमी लांबीची भूमिगत मेट्रो ही प्रकल्पही जलद गतीने पूर्ण झाले आहेत. या मेट्रोच्या निर्मितीत जपान सरकार आणि जायका संस्थेचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी 'मुंबई वन' या सर्वसमावेशक वाहतूक पद्धारे मेट्रो, मोनोरेल, बस, उपनगरी रेल्वे आणि वॉटर टॅक्सी या सर्व वाहतूक साधनांसाठी एकाच तिकीटाची सुविधा मिळणार आहे. तसेच, तरुणांसाठी कौशल्य विकास विभागाच्या नव्या योजना जाहीर करण्यात आल्या असून, विमानतळ आणि इतर उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले की, पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेला उपहार असून याच ठिकाणी देशातील पहिला ऑफशोर विमानतळ तयार करण्यात येत आहे. त्याच ठिकाणी चौथी मुंबई तयार होणार आहे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या पाठीशी आहेत. त्यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्र सातत्याने प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे महाराष्ट्राच्या विश्वासाचे प्रतीक – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, विविध विमाने टेक–ऑफ आणि लँडिंग करतात, पण भारताला आत्मनिर्भर आणि महासत्ता बनवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली प्रगती आणि विकास घेऊन आले आहे. नवी मुंबई हे केवळ विमानतळ नाही, तर नवीन भारतावरील महाराष्ट्राच्या विश्वासाचे प्रतीक आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून फक्त विमानांचे उड्डाण होणार नाही, तर एक मजबूत आणि आत्मनिर्भर भारत उभारला जाणार आहे. २१ व्या शतकात मोदीजींनी देशाची जबाबदारी स्वीकारली, तेव्हा देशात केवळ ७४ विमानतळ होते. गेल्या दहा वर्षांत ही संख्या दुप्पट होऊन १५० वर पोहोचली असून २०३० पर्यंत ती २२० करण्याचा संकल्प प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

देशातील सर्वात लांब भुयारी मेट्रो प्रकल्पाचे लोकार्पण देखील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. मुंबई मेट्रोच्या पहिल्या टप्प्याला हिरवा झेंडा देखील त्यांनी दाखवला होता. उत्तर आणि पश्चिम मुंबईला दक्षिण मुंबईशी भुयारी मार्गाने जोडणारी ही मेट्रो पायाभूत सुविधांचा उत्तम नमुना आहे. पुढील दोन–चार वर्षांत सर्व मेट्रो लाइन सुरू होतील आणि मुंबईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फक्त एका तासात पोहोचता येणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्यामुळे देशातील प्रमुख पायाभूत प्रकल्प महाराष्ट्रात उभे राहत आहेत. राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने तब्बल ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. 'शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही' हा दिलेला शब्द पाळला असल्याचे श्री.शिंदे यांनी नमूद केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने पीएम किसान सन्माननिधी योजनेंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना आतापर्यंत ३३,५६५ कोटी रुपये दिलेले असल्याचेही

(उर्वरीत पान २ वर)

# शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्हाची सुनावणी पुढे ढकलली !

दिल्ली /वृत्तसंस्था

शिवसेना आणि धनुष्यबाण पक्ष चिन्ह कोणाचे? यावर आज सुप्रीम कोर्टामध्ये सुनावणी पार पडली. यात सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा एकदा पुढील तारीख देण्यात आली आहे. आता १२ नोव्हेंबर रोजी शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्हावर सुनावणी होणार आहे.

सध्या शिवसेना नाव आणि चिन्ह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. याप्रकरणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याबाबत आव्हान दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कालावधी जवळ येत असल्याने उद्धव ठाकरे यांनी जुलै महिन्यात अंतरिम अर्जाद्वारे पक्ष आणि चिन्ह वापरण्यावर तात्पुरते निर्बंध घालण्याची मागणी केली होती.



ठाकरेंच्या शिवसेनेची बाजू मांडणारे वकील असीम सरोदे यांनी सुनावणी पार पडण्यापूर्वी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून पोस्ट करत एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. वकील असीम सरोदे यांनी एक्सवर पोस्ट करत मोठा प्रश्न उपस्थित केला होता.

'शिवसेना पक्षचिन्ह प्रकरण जस्टीस सूर्यकांत यांच्या बेंचसमोर आज १६ नंबरला लागलेले असल्याने ते प्रकरण सुनावणीसाठी रिच होणार हे नक्की. परंतु एका इतर एका अर्धवट सुनावणी झालेल्या प्रकरणातील बेंचचे सुद्धा जस्टीस सूर्यकांत सदस्य न्यायाधीश आहेत. त्यामुळे शिवसेना पक्षचिन्ह प्रकरणाची सुनावणी आज पूर्ण होईल का असे प्रश्नचिन्ह आहे. त्याचवेळी एकनाथ शिंदे यांच्यातर्फे असे प्रयत्न होतीलच की सुनावणी पुढे ढकलली जावी, असा आरोप असीम सरोदे यांनी यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केला होता. अखेर त्यांची शंका खरी ठरली असून शिवसेनेचा निकाल पुन्हा लांबणीवर पडला आहे.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील काही महिन्यात पार पडतील. त्याआधीच खरी शिवसेना कुणाची हा निकाल सुप्रीम कोर्ट देणार आहे. त्यामुळे धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांच्याकडे कायम राहणार की ते पुन्हा उद्धव ठाकरे यांना मिळणार हे आता सुप्रीम कोर्टाच्या पुढील निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

# तहसील कार्यालया समोर बैलगाडीला पेट्रोल टाकून लावली आग

केज/प्रतिनिधी

कोरडेवाडी ता.केज येथे धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्रीताई राठोड या गेल्या सहा दिवसांपासून उपोषणाला बसल्या आहेत.त्यांच्या उपोषणाकडे आणि मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने संतप्त गावकऱ्यांनी आज मोठ्या संख्येने बैलगाडी मोर्चा काढून केज तहसील कार्यालयावर धडक दिली.

यामोर्चाचे नेतृत्व बाळराजे आवारे

(उर्वरीत पान २ वर)



# हल्ल्याच्या निषेधार्थ संविधान प्रेमींकडून आज परळीत निदर्शने

परळी /प्रतिनिधी

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोर या वकिलावर गुन्हा दाखल करावा व या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात आज संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.

भारतीय संविधान आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी या देशातील न्याय व्यवस्था सर्वात महत्वाचा घटक आहे.देशात कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाही,शासन – प्रशासन भारतीय संविधानानुसार काम करत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करीत असते.धर्मानिरपेक्षक्ष संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे.आणि देशातील या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका सनातनी देशद्रोही वकिलाने बुट फेकून हल्ला केला आहे. हा हल्ला या देशाच्या न्यायव्यवस्थेवर आणि लोकशाहीवर झालेला आहे. ही घटना अत्यंत गंभीर आणि देशद्रोहाचा गुन्ह्यासारखीच आहे.

या हल्लेखोर राकेश किशोर

(उर्वरीत पान २ वर)


# बीड पुन्हा हादरलं! शेतीच्या वादातून थरकाप उडवणारी घटना

बीड: एका धक्कादायक घटनेने बीड पुन्हा एकदा हादरले आहे. शेतीच्या वादातून थरकाप उडवणारी घटना समोर आली असून नेकनुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनवती गावात भावकीतील चार जणांनी एका महिलेला निर्दयीपणे मारहाण करून तिचे पाय तोडण्याचा प्रयत्न केलाय. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पीडिता आश्विनी येडे यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विशेष म्हणजे आरोपीकडून याआधीही तीन महिलांवर अशाच पद्धतीने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. इतर महिलेला मारहाण करतानाचा थरारक व्हिडीओ देखील समोर आला आहे. महिलांना अमानुष मारहाण करतानाचा हा व्हिडिओ तीन महिन्यापूर्वीचा असून बीड जिल्ह्यातील या घटनेने पुन्हा एकदा कायदा–सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालंय. या प्रकरणाचा नेकनूर पोलीस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणामुळे कुटुंब मोठ्या दहशतीत असून संबंधित आरोपींवर कडक कारवाई करून आरोपींना जेरबंद करा अशी मागणी केली आहे.बीडच्या जिल्हा कारागृहात कैद्यांना धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव आणला जातो. त्यासाठी त्यांचा मानसिक आणि शारीरिक छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप बंदिवान कैद्यांचे वकील राहुल आघाव यांनी केलाय. बीड जिल्हा कारागृहातील चार कैदी वकील राहुल आघाव यांच्याकडे पक्षकार म्हणून आहेत.. आणि याच कैद्याच्या लेखी तक्रारीवरून अडवोकेट राहुल आघाव यांनी पत्रकार परिषद घेत जिल्हा कारागृह अधीक्षक वेटर्स गायकवाड यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तीन हिंदू आणि एक मुस्लिम पक्षकारावर कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाड धर्म परिवर्तनासाठी दबाव आणतात. धर्म परिवर्तन करत नसल्यास त्यांचा मानसिक व शारीरिक छळ केला जातो. त्यामुळे जिल्हा कारागृहात सध्या दहशतीचे वातावरण असल्याचा गंभीर आरोप आघाव यांनी यावेळी केला. दरम्यान या प्रकरणी उच्च न्यायालयात कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाड यांच्या विरोधात याचिका दाखल करणार असल्याचंही ऍडव्होकेट आघाव यांनी म्हटलं आहे.



चार जणांकडून महिलेचा पाय तोडण्याचा प्रयत्न



बीड – बीड जिल्ह्याच्या दबंग पोलीस अधिकारी पूजा पवार यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी पदाचा अधिकृत पदभार घेतल्यानंतर त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# बिहारची कसोटी

'सगळ्यात मागे, पण राजकारणात पुढे' अशी ज्याची देशात ओळख आहे, त्या बिहारची विधानसभा निवडणूक अखेर सोमवारी घोषित झाली. एकेकाळी 'दक्षिण आशियातला सर्वात मागास भाग' म्हणून ज्याची ख्याती होती, तो बिहार गेल्या काही वर्षांत बदलला; आधुनिकतेच्या, प्रगतीच्या खुणा मिरवू लागला. ही आधुनिकता खरी, की वरवरची? भौतिक मानकांप्रमाणे बिहारची मानसिकता बदलली का? असेल, तर किती? 'मंडल'पासून त्याने पुढे किती मजल मारली? ते ही निवडणूक दाखवून देईल. कारण या निवडणुकीत बिहारमध्ये २५ टक्के मतदान अत्याधुनिक तरुण पिढीचं आहे. एकूण ७ कोटी ४३ लाख मतदारांमध्ये ज्यांना 'जेन – झी' ही नवी संज्ञा मिळाली आहे, अशा १८ ते २८ या वयोगटातील मतदारांची एकूण संख्या १ कोटी ७७ लाख, म्हणजे २३.८ टक्के आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत बिहारमध्ये सर्वाधिक मतं राष्ट्रीय जनता दलाला मिळाली होती. २२ टक्के. त्यापेक्षा या मतदारांचा मतदानातील एकूण टक्का मोठा आहे! या मतदाराला ओळखणं राजकीय पक्षांपुढे मोठं आव्हान ठरतं आहे. जातीय समीकरणं, विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, विकासकामांवरील खर्च, भ्रष्टाचार या पारंपरिक मुद्द्यांपेक्षाही या पिढीला भावणारे निवडणुकीतले मुद्दे वेगळेच आहेत.

त्यांच्यावर मोबाइल फोन आणि त्यातील समाज माध्यमांचा मोठा प्रभाव आहे. समाज माध्यमांत सुरू असलेले ट्रेन्ड समजून घेण्यासाठी, ते आत्मसात करण्यासाठी किंवा त्याला योग्य दिशा देण्यासाठी भारतीय जनता पक्षाकडे सर्वात प्रभावी यंत्रणा आहे हे खरंच. पण, तरीही समाज माध्यमांवरून काय कधी फायदा फैलावेल आणि ते या पिढीला भावेल, हे अजून तरी कोणी ठामपणे सांगू शकलेलं नाही. त्यामुळे, बिहारच्या या निवडणुकीत एकूण मतदारांपैकी सुमारे २३ टक्के असलेल्या या मतदाराला कोण कसं हाताळतो, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असेल, असं सध्या तरी म्हटलं जातं आहे. भारतीय जनता पक्षाने त्यासाठीच तेथील लोकगायिका मैथिली ठाकूर हिला आवर्जून पक्षात आणलं असून तिला अलीनगर किंवा बेनिपट्टीतून उमेदवारी दिली जाईल, असा अंदाज आहे. दुसरा महत्त्वाचा मतदार आहे, महिला. मध्य प्रदेश, तेलंगण, महाराष्ट्रात हे सिद्ध झालं आहे. मध्य प्रदेशातील 'लाडली बहन', महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पाहून मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहारमध्येही 'मुख्यमंत्री उद्यमी योजना' आणून प्रत्येक महिलेच्या खात्यात सरसकट दहा हजार रुपये पाठवून दिले आहेत. सरकारने केलेला हा २ हजार १०० कोटींचा खर्च निवडणुकीत किती परिणाम करेल, हे प्रचाराच्या पहिल्या दोन फेऱ्यांतच दिसून येईल. मतदार याद्यांच्या सखोल पुनर्विलोकनाचा मुद्दा गेल्या काही महिन्यांपासून बिहारमध्ये गाजतो आहे. मतदार नोंदणीसाठी कुठली कागदपत्रं ग्राह्य धरायची इथपासून मतदानासाठी ओळख पटवताना मतदाराकडील कोणत्या शासकीय दस्तऐवजाला मान्यता द्यायची यावरही बिहारमध्ये खूप वाद झाला. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. तिथे काही गोष्टींबाबत स्पष्टता मिळाली. ढोबळमानाने पाहिलं, तर या निवडणुकीसाठी बिहारच्या मतदार याद्यांतून ६८ लाख ५० हजार नावं वगळली गेली, तर २१ लाख ५३ हजार नावं नव्याने समाविष्ट झाली. सन २००३ नंतर, तब्बल २३ वर्षांनी मतदार याद्यांचं सखोल पुनर्विलोकन झालं आहे. त्याचा निवडणुकीवर काय परिणाम होईल, ते निकालानंतरच स्पष्ट होईल. पण, या सगळ्या वादात निवडणूक आयोगाने घेतलेले काही निर्णय मात्र ऐतिहासिक ठरणार आहेत. त्यांची अंमलबजावणी या निवडणुकीत पहिल्यांदाच होणार आहे. प्रत्येक मतदान केंद्राचं वेबकास्टिंग, मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मतदान केंद्राची सीसीटीव्हीद्वारे निगराणी, मतदाराला आपला मोबाइल फोन मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्याची आणि प्रत्यक्ष मतदान कक्षात जाण्यापूर्वी जमा करण्याची सुविधा, ईव्हीएम मशीनमधील मतपत्रिकेवर उमेदवाराचं मोठ्या अक्षरात नांव; सोबत रंगीत फोटो अशा अनेक सुधारणांचा त्यात समावेश आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक मतदान केंद्रावर एक, याप्रमाणे ९० हजार ७१२ अंगणवाडी सेविका निवडणूक सेवेत तैनात करण्यात येणार आहेत. या सेविका बुरख्यात आलेल्या मतदाराची ओळख तपासणार आहेत.

# मुंबईची नव प्रभात: भारत-ब्रिटन संबंधांसाठी
# 'ब्रिस्क' युगाची सुरुवात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे (णघ) प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'च्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

ऐतिहासिक वळण: 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'चे रूप मिळाले आहे. 'भारत-यूके व्हिजन २०३५' या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन

मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला 'व्यापक आर्थिक आणि व्यापार करार' (उएढ– – उेािशहशपीळींश एलेपोळल रपव ढीरवश –सीशशाशपीं) आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील.

या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (ढरीळषषी) संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला (खपपेींरींळेप) प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात (ऋछझ) ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना (डचएीं) सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या (ठशव ढरशि) अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या 'व्यवसाय सुलभतेचे' (एरीश ेष ऊ-ळपस ईीळपशीीी) भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे 'व्यवसाय सुलभतेचे' हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.

या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.

हिंद-प्रशांतमध्ये (खपवे-झरलळषळल) सुरक्षा बंधन मजबूत करणे

ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे – जे 'व्हिजन २०३५'च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत (खपवे-झर-लळषळल) धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे.

अलीकडील नौदल सराव 'कोंकण २०२५'मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता (खपींशीेशीरलळश्रळीूं) आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.

याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' (ऊशषशपलश खपर्वीीीळरश्र ठेरवारि) खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास (उे-वर्शीशश्रोशिपीं) आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम (खपपेींरींळेप) आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

'लिव्हिंग ब्रिज': चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी धोरणात्मक करारांपलीकडे, 'लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी 'लिव्हिंग ब्रिज' या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा (ऊळरीेीिर – स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात.

२०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता (ढरश्रशपीं चेलळश्रळीूं) आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'व्हिजन २०३५'च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे.

याला पूरक म्हणून, भारत-यूके 'ग्रीन स्किल्स' भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये (एपींळीेपाशपींरश्र ठशीळश्रळशपलश) तरुणांची क्षमता विकसित करते – ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य

या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

'तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा' द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

हवामान कृती (उश्रळारींश -लींळेप) हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (इझ) आणि शेल (डहशश्रश्र) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता (डीीींरळपरलळश्रळीूं) हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

नव्या युगाची सुरुवात

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही-तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे (ऋ्षेलरश्र जीवशी) आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

**-ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),**
प्रधान सचिव तथा महासंचालक (माहिती व जनसंपर्क).

पान १ वरून...

**नवी मुंबई विमानतळ,..**

त्यांनी यावेळी सांगितले.

व्यापार, गुंतवणूक, पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार – उपमुख्यमंत्री अजित पवार

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. या विमानतळामुळे प्रवासाबरोबरच व्यापार, गुंतवणूक, पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

आज लोकार्पण झालेली मेट्रो-३ मार्गिका म्हणजे मुंबईकरांसाठी मोठा दिलासा आहे. 'कुलाबा-बांद्रा-सीप्झ' हा मार्ग सुरु झाल्याने शहराच्या दैनंदिन जीवनाला गती मिळणार आहे. मेट्रो लाईन-३ च्या 'फेज २-बी'च्या उद्घाटनाने मुंबईला नवी गती मिळणार आहे. ही भुयारी मेट्रो केवळ आधुनिक वाहतूक सुविधा नाही, तर जगातल्या प्रगत शहरांच्या बरोबरीने वाटचाल करणाऱ्या मुंबईची ओळख असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यकत् केला.

'मुंबई वन'हे प म्हणजे 'वन मुंबई, वन प या संकल्पनेची झलक आहे. हे प मुंबईकरांचा प्रवास अधिक सुलभ, सुत्रबध्द आणि स्मार्ट बनविणार असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर आज सुरु होत असलेले अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम हे आपल्या युवकांसाठी आशेचे नवे दालन आहे. कौशल्य विकासाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले दमदार पाऊल असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अकरा वर्षांत देशाने विकासाची नवी झेप घेतली आहे. 'विकसित भारत २०४७' या ध्येयाकडे आपण वेगाने वाटचाल करत आहोत आणि महाराष्ट्र त्या प्रवासात अग्रस्थानी राहील, असा विश्वास व्यक्त करून उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. आज सुरू झालेले हे प्रकल्प म्हणजे या राजधानीच्या विकासाला नवे पंख देणारे आहेत. विमानतळ आणि मेट्रोच्या प्रकल्पांमुळे मुंबईकरांच्या जीवनमानात आणि महाराष्ट्राच्या प्रगतीच्या प्रवासाला गती मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे भारताच्या उड्डाणाला नवीन गती – केंद्रीय नागरी उड्डयण मंत्री किंजरापु राममोहन नायडू नवी मुंबई ही नवीन आशा आणि उत्साहाचे प्रतीक आहे. जागतिक दर्जाच्या या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे भारताच्या उड्डाणाला नवीन गती मिळाली आहे. आजचा दिवस महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय नागरी उड्डयण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी केले.२०१४ नंतर मुंबई विमानतळावर प्रवासी वाहतुकीत मोठी वाढ झाली असून

पान १ वरून...

आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या १९० वरून २६० वर पोहोचली आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी नवी मुंबई विमानतळ नव्या संधींचे दार उघडणार आहे. अंदाजे १०० अब्ज गुंतवणुकीत उभारण्यात आलेले हे विमानतळ ३०,००० एकर क्षेत्रात पसरले असून सुमारे २ लाख तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करेल. सार्वजनिक-खाजगी भागीदारीचे हे एक आदर्श उदाहरण ठरेल, असे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा हवाई प्रवास उपलब्ध करून देऊ
– केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

देशातील सर्वोत्कृष्ट आणि कार्यक्षम विमान सेवा महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा बहुप्रतिक्षित आणि महत्वाकांक्षी प्रकल्प सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा हवाई प्रवास उपलब्ध करून देईल. अशा प्रकल्पांमुळे आगामी काळात सामान्य जनतेच्या हवाई प्रवासात मोठी वाढ होईल, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ नमूद केले.

केंद्र सरकारच्या ठोस धोरणांमुळे आणि खंबीर पाठिंब्यामुळे राज्यातील विविध विकास प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण होत असून, हे देशाच्या प्रगतीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात नमूद केले.

**तहसील कार्यालया समोर ...**

पाटील यांनी केले. तहसील कार्यालयाच्या आवारात आंदोलकांनी रोष व्यक्त करत बैलगाडी वर पेट्रोल टाकून ती पेटवून दिली.यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.कोरडेवाडी येथील साठवण तलाव मंजूर करावा.ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यात याव्यात. राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून प्रति हेक्टरी ५०,००० नुकसान भरपाई देण्यात यावी.या मागण्यांबाबत प्रशासनाकडून अद्याप ठोस भूमिका घेतली नसल्याने शेतकरी वर्गा मध्ये संतापाची लाट आहे. राजश्रीताई राठोड यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस असून त्यांच्या आरोग्याचीही स्थिती चिंताजनक होत चालली आहे.आंदोलकांनी चेतावणी दिली की, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

**हल्ल्याच्या निषेधार्थ ..**

वकिलावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी ११ वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड जिल्हा सोलार वेंडर्स असोसिएशनची स्थापना

## असोसिएशनच्या अध्यक्षपदी एकमताने पत्रकार अ‍ॅड.डी. बी. खान यांची निवड

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यावसायिकांना एकत्र आणण्यासाठी 'बीड डिस्ट्रिक्ट सोलार वेंडर्स असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. हा कार्यक्रम शनिवारी (दि. ४ ऑक्टोबर २०२५) रोजी यशराज इन, जालना रोड, बीड येथे पार पडला.

या प्रसंगी जिल्ह्यातील सर्व सोलार व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेमध्ये असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने करण्यात आली.पदाधिकारी याप्रमाणे,अध्यक्ष – डी. बी. खान, उपाध्यक्ष – संजय सानप,सचिव – गोपाळ पारीख,कोषाध्यक्ष – अशोक सिकची,कार्यकारी सदस्य – अनिल राऊत, वल्लभ दिवटे, उमेश करपे यांची निवड करण्यात आली आहे.सभेच्या शेवटी उपस्थित व्यावसायिकांनी संघटनेच्या स्थापनेबद्दल समाधान व्यक्त करत बीड जिल्ह्यातील सोलार क्षेत्रात शिस्त, गुणवत्ता आणि ग्राहकहिताचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला. जिल्ह्यातील सर्व सोलार व्यवसायिक उपस्थित होते.

असोसिएशनचे उद्देश

असोसिएशनच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश म्हणजे खोट्या आणि दिशाभूल



करणाऱ्या सोलार जाहिरातींना आळा घालणे, ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि सोलार प्रकल्पांबाबत पारदर्शकता राखणे हा आहे.सभासदांना सोलार क्षेत्रातील अद्ययावत माहिती व प्रशिक्षण देणे, शासकीय कार्यालयांमधील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच राज्य व केंद्र शासनाच्या सर्व सौर ऊर्जा योजनांच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करणे हेही संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.याशिवाय चछठए आणि चडएऊङ सोबत समन्वय साधून गुणवत्तापूर्ण सोलार इंस्टॉलेशनला प्रोत्साहन देणे, सोलार वेंडर आणि ग्राहक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे आणि हरित उर्जेचा प्रसार करणे, या दिशेने असोसिएशन कार्यरत राहणार आहे.

# अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमांमुळे तरुणांना प्रगतीची सुवर्णसंधी - प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी

## प्रधानमंत्री मोदीजींच्या हस्ते आयटीआयच्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचा शुभारंभ
## राज्याच्या कौशल्य विकास विभागाचे प्रधानमंत्री मोदी यांनी केले कौतुक

मुंबई : भारताला प्रगतीच्या नव्या उंचीवर घेऊन जाणारे लोकप्रिय प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या कौशल्य विकास विभागाचे कौतुक केले असून, आजपासून आयटीआयमध्ये सुरु झालेल्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांमुळे तरुणांना रोजगाराची सुवर्णसंधी असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री मोदीजी यांनी केले आहे. देश वेगाने प्रगती साधत असून, युवकांसाठी हा संधीचा सुवर्णकाळ असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नवी मुंबई विमानतळाच्या लोकार्पण सोहळ्यात मोदीजी यांच्या हस्ते अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचाही ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील युवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई मेट्रो तीनच्या अंतिम टप्प्याचा लोकार्पण सोहळा पार पडला. तसेच यावेळी त्यांच्या हस्ते राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयात अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचाही शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत, केंद्रीय हवाई




वाहतूक मंत्री श्री. किंजरापू नायडू, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार ,उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री श्री मुरलीधर मोहोळ आणि कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मोदीजी म्हणाले की, या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमात काळाला अनुरूप अत्याधुनिक रोबोटिक, ग्रीन हायड्रोजन ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सोलर ऊर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सोशल मीडिया प्रभावक (इन्फ्लुएंसर) इत्यादी अत्याधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. हे अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींना नव्या प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाणार आहेत. त्याचबरोबर त्यांनी नमूद केले की, देशातल्या आयटीआयला अत्याधुनिक तंत्रज्ञानासह जागतिक दर्जाच्या रोजगाराभिमुख संस्था बनवण्यासाठी केंद्र सरकारने ६० हजार कोटींची नुकतीच पीएम सेतू योजना सुरु केली आहे, त्याचाही देशातल्या युवकांना लाभ होणार आहे.

प्रगतीची दूरदृष्टी असलेले राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनीही यावेळी आयटीआयमधील अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमाचे महत्व विशद केले. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकासाला नवी दिशा देण्याचे काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वात नव्या भारताची निर्मिती होत आहे. या काळात अत्याधुनिक अभ्यासक्रमांच्या माध्यमाने आम्ही कौशल्ययुक्त महाराष्ट्र घडवू, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. दरम्यान, अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांच्या नोंदणीचे ७५ हजार उद्दिष्ट असताना शुभारंभालाच राज्यातील सुमारे एक लाख तीन हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करून, उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. पुढील वर्षात ही संख्या ५ लाखाच्यावर नेणार असल्याचे राज्याच्या कौशल्य विकास विभागाने सांगितले आहे.

एकीकडे प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते नवी मुंबईत 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' या महत्वकांक्षी उपक्रमाचे उदघाटन होत असतानाच राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालये मिळून ५६० संस्थांमध्ये एकाच वेळी विश्वकर्मांच्या प्रमुख उपस्थितीत या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आल्याचे राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

# मुख्याध्यापक गणेश वाघ यांना पितृशोक!

## संपादक तथा संस्थाचालक गोविंदराव वाघ यांचे निधन; शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार!

बीड (प्रतिनिधी) - शहरातील धांडे गल्ली येथील मूळ व सध्या यशवंत नगर भागातील रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर समाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ यांचे अल्पशा आजाराने आज बुधवार दिनांक ८ ऑक्टोबर२०२५ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले. निधना समय त्यांचे वय ७७ वर्ष होते. सायंकाळी ०७: ३० वाजण्याच्या सुमारास संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.



बीड शहरातील यशवंत नगर भागात रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर समाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ सर हे मागील काही दिवसापासून आजारी होते. परवा सोमवार रोजी अचानक त्रास होऊ लागल्याने त्यांना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना बुधवार दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी

दुपारी ०३ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राण ज्योत मालवली. श्री गोविंदराव वाघ सर यांना बीड आणि परिसरात 'नाना' या नावाने ओळखले जात होते. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात नानांचे उल्लेखनीय काम होते. शिक्षक म्हणून नोकरी करत असतानाच नानानीं स्वतःच्या मुलांना उच्चशिक्षित केले आज त्यांची सर्व मुले शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या बरोबर नानांनी शिवाय सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी स्वकर्तुत्वाने समाज उपयोगी

शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सायंकाळी ७:३० वाजता त्यांच्या पार्थिवावर संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी बीड शहरासह जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रासह विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी

डॉक्टर, इंजिनिअर, वकील, संस्थाचालक मुख्याध्यापक, शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री गोविंदराव वाघ यांच्या पश्चात पत्नी सुदामतीताई वाघ तिन मुले गणेश वाघ, नामदेव वाघ, दत्तात्रय वाघ, तीन सुना, एक मुलगी, जावाई, दोन बहिणी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. वाघ परिवाराच्या दुःखात दै._ परिवार सहभागी आहे.

# सम्यक दृष्टिकोनातून समाजपरिवर्तन शक्य - प्रा.डॉ.विक्रम धन्वे

बीड/प्रतिनिधी

आधुनिक समकालीन समस्यांचे उत्तर तथागतांच्या सम्यक दृष्टिकोनातून मिळते. तथागतांचा धम्म हा प्रकाशाकडून प्रकाशाकडे नेणारा सम्यक सन्मार्ग आहे. आजच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील गोंधळ, अन्याय, विषमता आणि मूल्यांचा ऱ्हास या सर्व समस्यांचे समाधान आपण बुद्धांच्या सम्यक विचारधारेत शोधू शकतो. असे प्रभावी मत प्रा.डॉ. विक्रम धन्वे यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.आनंद कौसल्यायन नगर येथे, आश्विन पौर्णिमा व वर्षावास समापन निमित्ताने मंगळवार (ता.७) रोजी धम्मदेसना,सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण




संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांच्या वर्षावास निमित्ताने हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी प्रा.डॉ. विक्रम धन्वे बोलत होते. यावेळी भन्ते बुद्धबोधी,

बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, फुले आंबेडकरी चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते अनिल डोंगरे, माजी सभापती श्रीहरी मोरे, बौद्ध धम्म स्विकारण्याची घोषणा करणारे नितीन मुजमुले, अंनिसचे अतुल बडवे, कैलास खरात, किशोर वाघमारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी भिक्खु धम्मशील थेरो यांनी उपस्थिती बौद्ध उपासक-उपासिका यांना धम्मदेसना दिली. दरम्यान विश्वजित पोटभरे, अभिजीत पोटभरे यांनी भोजनदान दिले.या धम्मदेसना कार्यक्रमाचे प्रास्ताविक अड राजेश शिंदे, सूत्रसंचालन परमेश्वर बनकर तर आभार रजनिकांत वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सदस्यांनी परिश्रम घेतले.

समाजाने अंधश्रद्धेला लाथाडे पाहिजे

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते अतुल बडवे यांनी कार्यक्रमात उपस्थितांना वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित प्रयोग दाखवून अंधश्रद्धेचे जोरदार खंडन केले.त्यांनी दाखविलेल्या सोप्या पण प्रभावी प्रयोगांमधून अंधविश्वासाऐवजी विज्ञान आणि विवेकावर विश्वास ठेवावा, असा संदेश दिला. कोणतीही दैवी चमत्कार नावाची गोष्ट जगात नाही, त्यामुळे अंधश्रद्धेला समाजाने लथाडे पाहिजे असे आवाहन करण्यात आले.

# रोकडेश्वरी आई देवी मंदिरचा जिर्णोद्धार व कलशरोहन मोठ्या आनंदात करण्यात आला - पांडुरंग आवारे-पाटील

बीड (चौसाळा प्रतिनिधी) दि.०७/ ऑक्टोबर २०२५ रोजी रोकडेश्वरी आई देवी जाग्रत देवस्थान मंदिराचा जीर्णोध्दार व कलशरोहन कार्यक्रम श्री.नरेश महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो भाविक भक्ताच्या उपस्थितीत संपन्न झाला या प्रसंगी ह भ प श्री संजय महाराज पाचपोर यांचे किर्तन सकाळी १० ते १२.३० वाजेपर्यंत झाले त्यानंतर मानेवाडी.ता.जि.बीड, पिंपळगाव घाट,वाढवणा, रूईगव्हान, माळेवाडी व पंचक्रोशीतील आलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी देवस्थान च्या वतीने मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले होते व यावेळेस १७२ रक्त दात्यांनी रक्तदान केले व पंचक्रोशीतील आलेल्या हजारो भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे-भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस प्रमुख उपस्थिती लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथील महंत श्री योगी सोमवार नाथजी,श्रीयोगी स्मशेर नाथजी,श्रीयोगी सिद्धेश्वर



नाथजी,श्रीयोगी बद्रीनाथजी व बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सौ.सरलाताई कामराज मुळे, पोलीस निरीक्षक श्री अजिनाथ काशिद साहेब,डॉ सारीका योगेश क्षीरसागर, चौसाळ येथील वैद्यकीय अधिकारी डॉ वैभव मोटे साहेब मा जि प सदस्य विलास महाराज शिंदे, अशोक लोढा,बबनराव गवते,अँड गणेश मोरे,शैलेश सुरवसे,नितीन धांडे,मा सभापती काकासाहेब जोगदंड,बाळासाहेब राऊत, युवा नेते दिनेश साठे,धाराशिव मा जि प सदस्य महादेवराव आखाडे व अन्य सामाजिक राजकीय विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.रोकडेश्वरी आई देवी मंदिर देवस्थान येथे आलेल्या प्रमुख मान्यवराचे देवस्थान च्या वतीने स्वागत करण्यात आले.व देवस्थान येथे आलेल्या सर्व भाविक भक्ताचे पांडुरंग आवारे-पाटील यांनी आभार मानले

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग )**

## जाहिर प्रगटन

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनूषंगाने आपणास कळविण्यात येते की प्रकरणात संदर्भ क्र १ नूसार अर्जदार शेख कासम शेख महमद रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१.०७.१९८० रोजी तलवाडा येथे जन्म झाला आहे. काही कारणास्त्व ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा येथे नोंद झाली नाही, करीता जन्म नोंद आदेशाची मागणी या कार्यालयास केलेली आहे.

संदर्भ क्र ०१ चे शासन निर्णय दिनांक १२.०३.२०२५ मध्ये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व करीता उकत अनूषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५ / ईऑ९ ९११८१)/प्र.क्र२२ / कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांकं १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई / तलवाडा/ चकलांबा यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी तलवाडा यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती, एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ८००/२०२५**
**शांताबाई श्रीराम जाधव - विरुध्द निरंक**
**(मार्फत अ‍ॅड. ठोसर डी के )**

ज्याअर्थी मयत नामे श्रीराम गेमा जाधव हे दिनांक २३.०९.२०२४ रोजी गौडगाव तांडा, पो. राजपिंपरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार
१. शांताबाई श्रीराम जाधव वय ६५ वर्षे धंदा-शेती
रा. गौडगाव तांडा, पो. राजपिंपरी, ता. गेवराई जि. बीड
२.रविंद्र श्रीराम जाधव वय ३३ वर्षे धंदा शेती
रा. गौडगाव तांडा, पो. राजपिंपरी, ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय गदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाम श्रीराम गेमा जाधव रा. गौडगाव तांडा, पो. राजपिंपरी ता. गेवराई जि. बीड याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
पुढील तारीख ११.११.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस एन पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ८०३ / २०२५**
**मुक्ताबाई तोळा राठोड, विरुद्ध निरंक**
**(मार्फत अँड. ठोसर डी के )**

ज्याअर्थी मयत नामे तोळा तुकाराम राठोड दिनांक २३.०९.२०२४ रोजी गौडगाव ता.गेवराई जि. बीड येथे झालेले आहेत.

अर्जदार
१. मुक्ताबाई तोळा राठोड वय ७६ वर्षे धंदा शेती
रा. गौडगाव ता. गेवराई जि. बीड
२.विठ्ठल तोळा राठोड
वय ४९ वर्षे धंदा-शेती रा. गौडगाव ता. गेवराई जि. बीड
३. अंकुश तोळा राठोड
वय ४२ वर्षे धंदा शेती रा. गौडगाव ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन अंक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यानी या न्यायालयाकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे असेल तर या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावर लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार याना सदर मयत नामे तोळा तुकाराम राठोड ग गौडगाव ता. गेवराई जि. बीड याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारिख : ११.११.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**मा.श्री. आर. एस. ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड**
**यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १४८०/२०२५**
**(मार्फत विधिज्ञ: पी एन जरांगे)**

अर्जदार : पुजा धनंजय शिंगटे, वय-३० वर्षे, धंदा-घरकाम
रा.संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड ता.जि.बीड
२.राजाऊ धनंजय शिंगटे, वय-०४ वर्षे, अज्ञान अपाक आई अर्जदार क्र.१ रा.वरीलप्रमाणे
३.अनिता लक्ष्मण शिंगटे वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा.वरीलप्रमाणे
४. लक्ष्मण सदाशिव शिंगटे, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.वरीलप्रमाणे
विरूध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे धनंजय लक्ष्मण शिंगटे हे दिनांक २७/०५/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क ३ व ४ हे मयताचे आई-वडील आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०३/१० /२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:- १०/११/२०२५.

आदेशावरून
स्वाक्षरित/-
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५६९ दि.२४.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान राजु सुभाष जाधव रा.ईश्वर नगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिध्दार्थ राजु जाधव | मुलगा | १२.०४.२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७५७ दि.२२.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान म.फयाज म.रियाज कुरेशी, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | म.फयाज म.रियाज कुरेशी | स्वतः | १५.०५.१९७० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४९१ दि.२२.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अर्जुन नारायण कऱ्हाळे, रा.लोणार भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पार्थ अर्जुन कऱ्हाळे | मुलगा | १२.०२.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५५९ दि.२४.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अर्जुन नारायण कऱ्हाळे, रा.लोणार भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जय अर्जुन कऱ्हाळे | मुलगा | १२.१२.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# तागडगाव येथे वेठबिगारीत अडकलेल्या बालकांची व कामगारांची सुटका

## जिल्हा प्रशासन व विधी सेवा प्राधिकरणाचे संयुक्त रेस्क्यू ऑपरेशन

बीड :- समाजाला हादरवून टाकणारी एक गंभीर घटना शिरूर कासार तालुक्यातील तागडगाव येथे उघडकीस आली आहे. पालघर जिल्ह्यातून पाच वर्षांपूर्वी कामासाठी आलेल्या काही मजुरांना वेठबिगारीच्या जाळ्यात अडकवून ठेवण्यात आले होते. त्यांनी सुरुवातीला फक्त पाच ते दहा हजार रुपयांची उचल घेतली होती, मात्र ती संपल्यानंतरही त्यांना परत जाऊ देण्यात आले नाही. उलट वापस जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांना मारहाण केली जात होती आणि तीन-चार कोयत्यांच्या धाकावर सतत धमकावले जात होते.

या मजुरांपैकी एकाने संधी साधून पालघर येथील एका सामाजिक कार्यकर्त्याला या अमानवीय परिस्थितीबद्दल माहिती दिली. त्यानंतर त्या कार्यकर्त्याने बीड जिल्ह्यातील 'अधिकार मित्र' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून



जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य तत्वशील कांबळे यांच्याशी संपर्क साधला. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता कांबळे यांनी तातडीने जिल्हाधिकारी बीड यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण माहिती दिली.

बॉण्डेड लेबर (वेठबिगार) प्रकरण म्हणून ओळखल्या गेलेल्या या घटनेची बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी गंभीर दखल घेऊन महसूल, पोलीस, महिला व बालविकास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व असंघटित कामगार सेलच्या संयुक्त टीमसह तागडगाव येथे रेस्क्यू ऑपरेशन राबविले.

या मोहिमेतून दहा बालके आणि दोन प्रौढ व्यक्तींची यशस्वी सुटका करण्यात आली. या प्रकरणात शिरूर कासार तालुक्यातील तागडगाव येथील तीन व पाथर्डी तालुक्यातील एक अशा चार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १४३(५), १२७(४), ३५१(२), ३(५), बंदविगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम १९७६ कलम १६, १७, १८, बालकामगार (प्रतिबंध व विनियमन) अधिनियम १९८६ कलम १४, अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ कलम ७५ व ७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुटका करण्यात आलेल्या कुटुंबीयांमध्ये ११ वर्षांची एक मुलगी तब्बल दीड वर्षापासून एका आरोपीच्या घरी गुरे चारणे आणि घरगुती काम करत होती.दुसरी मुलगी गेल्या तीन महिन्यांपासून दुसऱ्या आरोपीकडे जबरदस्तीने काम करत होती.तिसरी मुलगी अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात कामासाठी घेऊन गेली होती.सर्व बालकांची आणि कामगारांची सुरक्षित सुटका केल्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी स्वतः त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर संवाद साधला. त्यांनी या बालकांशी घडलेल्या अत्याचारांविषयी जाणून घेतले आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी तात्काळ आदेश दिले.

ही संपूर्ण कारवाई जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती श्री. आनंद यावलकर तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि सचिव डब्ल्यू. ए. सय्यद, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार चे तहसीलदार सुरेश घोळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, संरक्षण अधिकारी अनिता कदम, जिल्हा विधी सेवा समितीचे सदस्य तत्वशील कांबळे, ॲड. बडे तसेच असंघटित कामगार सेलच्या समन्वयाने पार पडली.

ही कारवाई केवळ कायद्याची अंमलबजावणी नसून मानवतेसाठीची एक संवेदनशील लढाई असल्याचे मानले जात आहे.

# माहिती अधिकार कायाद्याचा प्रभावी वापर कसा करावा ? - डॉ. शरद पवार



बीड प्रतिनिधी

आंतराष्ट्रीय माहिती अधिकार दिनाचे औचित्य साधून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात माहिती अधिकार कायद २००५ व प्रत्यक्ष अंमलबजावणी या विषयावर महत्वपुर्ण व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. शरद पवार हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी आणि योग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन केले.

ज्यामुळे हा कायद्या सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरेल. डॉ. पवार यांनी माहिती अधिकार कायद्याचा वापर करताना येणा-या अडचणी व त्यावरील उपाय सांगितले. अर्ज कसा लिहावा, ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने सादर करण्याची प्रक्रिया काय आहे. तसेच माहितीचा अर्ज कशा प्रकारे सुचिबध्द केल्यास सार्वजनिक माहिती अधिका-याला माहिती शोधने आणि पुरवणे सोपे होते. ज्यामुळे अर्जदाराला माहिती मिळवण्यास विलंब होत नाही. विविध उधारणाच्या माध्यमातुन कायद्याचा प्रत्यक्ष वापर कसा करावा या संदर्भात त्यांनी सखोल मार्गदशन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवानंद क्षीरसागर हे उपस्थित होते. त्यांनी कायद्याचा उदेश, फायदे व होणारा गैरवापर यासंदर्भात मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी कायद्याचे महत्व स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर , महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, श्री. विश्वंभर देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इरलापल्ले पल्लवी यांनी केले. सुत्रसंचालन राज्याशात्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गणेश कदम तर आभार डॉ. संजय मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. पांडूरंग केदार, श्री संजय काळे सर्वांचे सहकार्य लाभले

# सेवानिवृत्त उपअभियंता मारोतराव कराड यांचे निधन

बीड (प्रतिनिधी):

बीड जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी हिरालाल कराड यांचे चुलते आणि सहाय्यक कार्यकारी अभियंता महेश मारोतराव कराड यांचे वडील मारोतराव मुकुंदराव कराड(दादा) यांचे बुधवार दिनांक ८ ऑक्टेंबर २०२५ रोजी निधन झाले. मृत्यू समय त्यांचे वय ८५ वर्षे होते.

मारोतराव कराड यांनी पाटबंधारे विभागात उपभियंता म्हणून सेवा केली. कवी म्हणून येथे सुप्रसिद्ध होते. त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. कार्यतत्पर, मनमिळावू आणि प्रामाणिक



अधिकारी म्हणून ते सुपरिचित होते.त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून,जावई व नातवंडे असा परिवार आहे. महेश कराड, सहाय्यक कार्यकारी अभियंता, सिडको, मुंबई यांचे ते वडील होते.

# शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र निदर्शने

बीड /प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.

यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है, शिवसेनेचा विजय असो, शेतकऱ्यांनची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, सरसकट मदत झालीच पाहिजे , एकरी



५०,००० रु. मदत मिळालीच पाहिजे अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिकांनी दिल्या यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख व जिल्हाप्रमुखांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार यापुढेही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले , उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नितीन भैय्या धांडे,संजय महाद्वार, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख महादेव परसकर,तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे ,तालुका सहसचिव संदिप भानप, कामगार नेते रविअणणा वाघमारे,माजी प.स. सदस्य नवनाथ प्रभाळे , विनोद गुंड पाटील, मच्छिंद्र सावंत,सर्कलप्रमुख रमेश नवले, उपसरपंच बाळासाहेब कुटे , मनिष कुटे ,आदेश कुटे ,रामू पैठणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शील पालन हा नीतिमत्तेचा पाया आहे - भिक्खु पय्यानंद थेरो

# कठीण चिवरदान, वर्षावास समापन सोहळा उत्साहात संपन्न

## बोधिवृक्ष पूजा करून भव्य मिरवणूक काढण्यात आली, महिला उपासीकांची लक्षवेधी उपस्थिती

लातूर /प्रतिनिधी

तथागत भगवान बुद्धाची शिकवण ही प्रज्ञा, करुणा, मैत्री आणि सद्गुण शील सदाचाराची आहे. मानवी समाज हा नैतिकतेने प्रगत होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वार्थाने नैतिक गुणाचे पालन जबाबदारीने प्रत्येक स्त्री-पुरुषांनी करणे आवश्यक आहे. नैतिक गुणाचे पालन करणे म्हणजेच शील पालन करणे होय आणि म्हणूनच शील पालन हा नीतिमत्तेचा पाया असल्याचे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे अश्विन पौर्णिमे निमित्त वर्षावास समापन व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते.प्रारंभी पवित्र बोधी वृक्षाची पूजा करून प्रतिकात्मक बौध्द चैत्य स्तुपाची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.तद्यनंतर महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील व सामूहिक बुध्द वंदना घेण्यात आली.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रशांत दाणी (मुख्य अभियंता, लातूर), डॉ. बाबासाहेब शेंडगे, भा. बौ. महासभेच्या जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे, वंचित बहुजन आघाच्या शहराध्यक्ष सुजाता अजनिकर हे उपस्थित होत्या.यावेळी डॉ. सतीश डोंगरे, प्रा. यु. डी. गायकवाड, पूनम दाणी, ललिता गायकवाड, मंगल सुरवसे यांच्या सह प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.प्रसंगी आशा चिकटे, कविता कदम, प्रतिभा आदमाने, सुजाता अजनिकर, कल्पना कांबळे,



विलास अवशंक आदी जनाकडून भिक्खु संघास कठीण चिवरदान करण्यात आले.

यावेळी श्रमन बाबासाहेब शेंडगे या छोटया बालकाने बुद्ध धर्मातील विविध गाथांचे पठण करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे यांनी केले तर आभार निर्मला गौरकर यांनी मानले.या वेळी महामाया उपासिका संघ, सिद्धार्थ सोसायटी यांच्यावतीने भोजन दान देण्यात आले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भंते बोधिराज, मिलिंद धावारे, ज्योतीराम लामतुरे, सतीश मस्के, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, करण ओव्हाळ, अविनाश आदमाने, कृष्णा सुरवसे, नवनाथ कांबळे, गौतम आदमाने सह धम्म सेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.या प्रसंगी भीमराव चौदंते, आर. पी. गायकवाड, ये पी कांबळे, सत्यप्रकाश कांबळे, डॉ. अरुण कांबळे, अशोक कांबळे, अंतेश्वर थोटे, पांडुरंग अंबुलगेकर, सुधाकर कांबळे, उत्तम कांबळे, टी. एस. कवठेकर, सूर्यभान लातूरकर, निर्मला थोटे, शामल कांबळे, पंचशीला बनसोडे, मंगल सुरवसे, ललिता गायकवाड, पुष्पा बोडके, विजया गायकवाड, अंजली कांबळे, मयुरी आल्टे, सरिता बनसोडे, पंचशीला भडके, भाग्यश्री सावंत यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर, विविध नगरातील महिला मंडळ, उपासक उपासिकांची लक्षवेधी उपस्थिती होती.




बीड /प्रतिनिधी

गर्भाक्षय मुखाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण कशा प्रकारे वाढत जात आहे त्याची कारणे काय आहेत व हा कॅन्सर होवू नये म्हणून कशाप्रकारे काळजी घ्यावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन प्रमुख वक्त्या डॉ. जयश्री घुगे यांनी विद्यार्थीनींना केले.महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर , महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, श्री. विश्वंभर देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. जे. क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. दुष्यंता रामटेके तर आभार डॉ. पल्लवी इरलापल्ले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला कक्ष समितीचे सर्वांचे सहकार्य लाभले.

# कागदपत्र तपासणीसाठी दिव्यांग शिक्षक, कर्मचाऱ्याचे हाल; तीन तास उशिरा तपासणी; ढिसाळ नियोजन

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांची कागदपत्राची तपासणी बुधवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी ठेवण्यात आली होती. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांची हेळसांड झाली. अचानक ठिकाण बदलल्याने पहिल्या मजल्यावर तपासणीचे ठिकाण असल्यामुळे दिव्यांगाला शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला.समाजकल्याण विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार राज्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रासह युआयडी तपासणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना बीड जिल्हा परिषदेत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

बुधवारी सकाळी १०.०० वाजता दिव्यांगानी जिल्हा परिषदेत हजेरी



लावली. अचानक रामचंद्र दिव्यांग शिक्षक, साधनव्यक्ती यांना जिल्हा स्काऊटभवन कार्यालयात जाण्याचे सांगितले. तर उर्वरित विभागाचे दिव्यांग कर्मचाऱ्यांना जिल्हा परिदेच्या सभागृहात थांबण्याचे सांगितले. सकाळी दहा वाजता सदर दिव्यांग कर्मचारी कागदपत्राची तपासणी व्हायला हवी होती. मात्र स्काऊट भवन येथे गेलेल्या कर्मचाऱ्यांची तपासणी तब्बल तीन तासाने म्हणजे दुपारी १.०० वाजता सुरू झाली. याला तपासणी करण्यासाठी नियोजन असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागला.

रॅम्प आणि लिफ्ट नसल्याने दिव्यांगाचे झाले हाल

बीड जिल्हा परिषदेच्या सभागृहापर्यंत जाण्यासाठी रॅम्प नाही. जिल्हा परिषदेच्या इमारतीतील लिफ्ट सुरूच नसल्याने दिव्यांग कर्मचाऱ्यांना तपासणीच्या ठिकाणापर्यंत जाण्यासाठी त्रास घ्यावा लागला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# कापुस शेतीला बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई द्या

## आ. विजयसिंह पंडित यांची कृषी राज्यमंत्र्यांकडे मागणी

गेवराई (प्रतिनिधी) :- कापुस उत्पादक शेतकर्यांना जिरायती क्षेत्राच्या वर्गवारी नुसार अतिवृष्टीची नुकसान भरपाई दिली जात असल्या प्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी आज लेखी निवेदन देवुन कापुस शेतीला बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राज्याचे कृषी राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांच्याकडे केली. बागायती वर्गवारी साठी आवश्यक असलेले सर्व निकष कापुस शेतीला लागु होत असल्यामुळे नुकसानग्रस्त कापुस उत्पादक शेतकर्यांना प्रति हेक्टरी २७ हजार ५०० रुपये प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम द्यावी अशी मागणी त्यांनी लेखी निवेदनाव्दारे केली आहे. या प्रकरणी आ. विजयसिंह पंडित यांनी राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांना लेखी निवेदन दिले आहे. या मागणीसाठी शेवट पर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे आ. पंडित यांनी सांगितले.

मराठवाड्यात विशेषत: बीड जिल्ह्यात अतिवृष्टी व महापुर परिस्थितीमुळे शेतकर्यांचे सार्वाधिक नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यातही तुलनेने गेवराई विधानसभा मतदार संघात नुकासनीची दाहकता जास्त आहे. शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्या बद्दल आ. विजयसिंह पंडित शासनानचे आभार मानले आहेत. मात्र प्रशासनाकडुन सुरु असलेल्या पंचनाम्याच्या अनुषंगाने त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेवराई विधानसभा मतदार संघात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र आहे, बहुतांश बागायत शेत जमिनीमध्ये कपाशीचे पिक घेतले जाते. तरीही कापुस उत्पादक शेतकर्यांना जिरायती



पिकांसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई मिळणार असल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत आक्षेप नोंदविला आहे.

या बाबत आ. विजयसिंह पंडित यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, गेवराई विधानसभा मतदार संघात सुमारे १ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली जाते. कापुस पिकासाठी विहीर, पाटपाणी, ठिबक सिंचन आदी माध्यमातुन पाणी दिले जाते. खत, बि-बियाणे, किटकनाशके आदींवर मोठा खर्च शेतकरी करतात. अलीकडच्या काळात अनेक शेतकरी कपाशीला पाणी देवुन फडतरीसह सुमारे आठ महिण्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी हे पिक घेत असल्यामुळे एका वर्षी एकच पिक शेतकर्यांना घेता येते. त्यामुळे बागायती वर्गवारी मधील सर्व निकष कापुस पिकाला लागु होतात. महसुल विभागाच्या वर्गवारी नुसार शासकीय अभिलेख्यात ज्या शेती जमिनीची वर्गवारी बागायती क्षेत्र म्हणुन केली आहे त्या क्षेत्रावर प्रामुख्याने कपाशीची लागवड झालेली दिसुन येते. असे सर्व असतांना कापुस पिकासाठी नुकसान भरपाई देतांना जिरायती क्षेत्राचे निकष का ? असा सवालही आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित करुन कापुस उत्पादक शेतकर्यांवर अन्याय करु नका असे शासनाला लेखी पत्राव्दारे कळविले आहे.

कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे इतरत्र दौर्यावर असल्यामुळे त्यांनी बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी कृषी विभागाचे राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांची भेट घेवुन त्यांना या बाबतची तपशिलवार माहिती दिली. यावेळी त्यांनी राज्यमंत्र्यांना लेखी निवेदन देवुन कापुस उत्पादक शेतकर्यांना बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाईची २७ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. या प्रकरणी नुकसानग्रस्त कापुस उत्पादक शेतकर्यांच्या हितासाठी शेवट पर्यंत प्रयत्न करणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी शेवटी सांगितले आहे.



## शिवसेना उबाठा पक्षाचे राज्यव्यापी आंदोलन केज येथे संपन्न

केज/प्रतिनिधी

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व शिवसेना नेते अंबादास दानवे,उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख परशुराम जाधव,सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या आदेशावरून तहसील कार्यालय केज येथे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्यानेतृत्वाखाली केज तालुक्यातील शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमुक्ती,शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५०००० हजार रूपये अनुदान द्यावे पिकविम्याचे बोगस निकष बंद करणे,पडझड झालेली घरे व मृत पावलेल्या पशुधनासाठी भरघोस मदत मिळावी यासह विविध माग्यासाठी घरणे आंदोलन,निदर्शने करण्यात आले.या वेळी उपस्थित शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## महाराणी ताराबाई विद्यालयाचा जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक

साई टिपरे याची विभागीय स्पर्धेसाठी निवड.

वडवणी । प्रतिनिधी

युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड यांच्या वतीने सोमवार दि.०६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा बीड येथील,छत्रपती शिवाजी महाराज संकुलन येथे संपन्न झाली.

या स्पर्धेत वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी चि.साई ज्योतीराम टिपरे यांनी १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये बुद्धिबळ खेळामध्ये प्रभावी खेळ करून प्रथम क्रमांक पटकावला या कामगिरीमुळे शाळेचे नाव जिल्ह्यामध्ये रोशन झाले आहे. शाळेचे क्रीडा शिक्षक निवरकर सर यांच्या सततच्या मार्गदर्शनाखाली हे यश त्याने संपादन केले.

या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव,माजी आमदार केशवराव आंधळे , विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा बीड भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# शिरूर तालुक्यातील तागडगांवातुन १० वेठबिगार व बालकामगारांना केले मुक्त !

## जिल्हा प्रशासनाची संयुक्त कारवाई !

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील तागडगांवातुन काल परजिल्ह्यातील बंदिस्त मजुर व त्यांच्या सोबतचे असणारे बालकामगार म्हणून काम करणारे लहान बालके यांची सुटका करण्यात येऊन बाल कामगार ठेवणाऱ्या ४ आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत माहिती अशी की शिरूर तालुक्यातील तागडगांव येथे गेल्या पाच वर्षांपासून शेंड्याची मेट मोढाळा तालुका पालघर जिल्हा पालघर येथील काही मजूर व त्यांच्या सोबतचे असणारे लहान मुले यांना बंदिस्त ठेऊन त्यांच्या कडून तुटपुंज्य मोबदल्यात अंगमेहनतीचे काम करून घेतले जात आहे अशी माहिती संबंधित कुटुंबातील व्यक्तीने सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या कडे समक्ष दिली होती त्यानुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तात्काळ दखल घेत या प्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश दिल्याने तहसीलदार सुरेश घोळवे, व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, महिला बाल कल्याण विभागाच्या संरक्षण अधिकारी अनिता कदम, सरकारी कामगार अधिकारी कार्यालयाचे अजय लव्हाळे, शिरूर पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, यांनी समक्ष पाहणी केली असता तागडगांव येथील धर्मराज हिरामण धनवटे, मारुती सानप, नंदू पवार,रामहरी खेडकर यांच्या कडे काही महिला व पुरुष कामगार हे सोयाबीन काढणी करत असताना आणि काही बालके हे गुरे चारणे, धुणे भांडे करणे व इतर अंग मेहनतीचे काम करत असलेले स्थितीत आढळुन आले व काही बालके हे बंद कोपित आढळुन आले असता विचार पूस केली त्यावेळी कामगारांनी आमच्या कडून विनामोबदला काम करून घेतले जात आहे व आमच्या मुलां कडून देखील काम करून घेतले जात असुन आम्ही बंदिस्त असल्याने आम्हाला व मुलांना सोडवा असे सांगितल्याने संयुक्त पथकाने तसा पंचनामा करून



मजुर व बाल कामगार यांना सोबत घेऊन पोलिस स्टेशन शिरूर येथे आणण्यात आले व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सुरेश घोळवे, सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, सामाजिक कार्यकर्ते समिर पठाण यांच्या उपस्थितीत असंघटित कामगार विशेष सेल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य अधिकार मित्र तत्त्वशील कांबळे यांच्या फिर्यादी वरून गु. र. नं. २८५/२०२५ नुसार बंद बिगार पद्धती अधिनयम चे कलम १६,१७ व १८ बालकामगार अधिनयम १९८६ चे कलम १४ व बाल न्याय कायदा २०१५ चे कलम ७५ व ७९ तसेच भारतीय न्याय संहिता चे कलम ३(५),३५१(२) ,१२७(४) १४३(५) नुसार आरोपी धर्मराज हिरामण धनवटे, मारुती ध्न्यानदेव सानप, नंदू ज्ञानदेव पवार आणि रामहरी आश्रूबा खेडकर यांच्या विरोधात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी धर्मराज धनवटे यास पोलिसांनी अटक करून शिरूर येथील न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयाने दिनांक १० ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली असून या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी हे करत आहेत

# राज्य शासनाने केलेली मदत ही खोटी आहे सरकट मदत करा

वडवणी /प्रतिनिधी

३१ हजार ५०० कोटीच्या पॅकेज मधून शेतकऱ्यांमध्ये खोटा नरेटीव्ह पसरण्याचे काम राज्य सरकारने केले आहे. शेतकऱ्यांची मूळ मागणी हेक्टरी सरसकट ५० हजार रुपये नुकसान भरपाई, सरसकट संपूर्ण कर्जमुक्ती, पिक विम्याचे निकष पूर्ववत करावे. पुरात वाहून गेलेल्या घरांची, जनावरांची व दुकानांची आर्थिक भरपाई मुबलक प्रमाणात मिळावी ही असल्याने आज या मागण्या मान्य केल्या तरच शेतकऱ्यांना न्याय मिळेल यासाठी शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने वडवणी तहसील कार्यालय समोर तीव्र निदर्शने करत तहसीलदार यांना या मागण्यांचे निवेदन



देण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे शिवसेना, जेष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव, युवराज मामा शिंदे, विष्णुपंत टकले, सरपंच संजय धपाटे, नवनाथ मोरे,परमेश्वर सातपुते, अशोक गोंडे, ग्रामपंचायत सदस्य महेश जाधव, उध्दव काकडे, अशोक बापू चाटे,गणेश जोगदंड, परमेश्वर नागवे, अकाश सावंत, जालिंदर चिनके,मोरे बापु, दत्ता वाघमारे सह उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठय़ा संख्येने होते.

# जागेची किंमत कमी करून देतो केज सह दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा नवा खेळ सुरु !

दस्त नोंदणीसाठी घेतले जातात हजारो रुपये, नागरिकांचा संताप

केज/प्रतिनिधी

केज शहरातील सह दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.दस्त नोंदणीसाठी गोरगरीब जनतेकडून हजारो रुपयांची लाच मागवली जाते,अशी गंभीर तक्रार नागरिकांनी केली असून, या लुबाडणाऱ्या दलाल व संबंधित कर्मचाऱ्यां विरोधात कठोर कारवाई करावी,अशी मागणी पक्षकारांकडून होत आहे.

शासनाच्या नियमानुसार, शेतजमीन,घर किंवा जागा खरेदी-विक्रीसाठी सरकारने निश्चित केलेल्या




मुल्यांकनावर आधारित फी भरून दस्त नोंदणीची प्रक्रिया केली जाते.मात्र, प्रत्यक्षात शासनाचे शुल्क भरूनही दस्त नोंदणी साठी अतिरिक्त रकमेची मागणी दलालांच्या माध्यमातून केली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.अलीकडेच दलालांनी नवीन फसवणुकीची पद्धत सुरू केली आहे.जागेची किंमत कमी करून देतो,तुमची जागा बागायती सर्वे नं मध्ये दाखवत आहे किंमत जास्त होईल त्यामुळे तुम्हाला जास्त चलन भरावे लागेल,पण आम्ही ते कमी करून देतो;मात्र त्यासाठी वरून वेगळी रक्कम द्यावी लागेल, आणि ऑपरेटरचे वेगळे पैसे द्यावे लागतील अशी बनावट आश्वासने देऊन नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले आहे.अशा पद्धतीने दस्त नोंदणी प्रक्रियेत भ्रष्टाचाराचे जाळे अधिक घट्ट झाले आहे.काही दलाल आणि संबंधित कर्मचारी दस्त नोंदणीपूर्वीच व्यवहार ठरवतात आणि व्यवहार पूर्ण झाल्यावर कमिशनच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैसे घेतात.ही अवैध पद्धत उघडपणे सुरु असून, गोरगरीब जनतेचे आर्थिक शोषण होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा,ना खाने दूंगा अशी घोषणा केली असली तरी या कार्यालया तील दलाल व काही कर्मचारी या घोषणेची थट्टा करत असल्याचे नागरिक सांगत आहेत. आमचं कोणी काही करू शकत नाही याभावनेत हे लोक वावरत असून, भ्रष्टाचाराचा उघड उघड काळाबाजार सुरू आहे.

नागरिकांनी शासनाकडे मागणी केली आहे की, या दलाल आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करून आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यात यावी.तसेच, सह दुय्यम निबंधक कार्यालयातील भ्रष्टाचारावर अंकुश घालून सर्वसामान्यांना न्याय मिळावा,अशी तीव्र मागणी जनतेकडून होत आहे.

# अंबड येथील श्री मत्स्योदरी देवी संस्थान येथे प्राक्षाळ पूजेनं दुमदुमलं मंदिर परिसर

## तहसीलदार विजय चव्हाण यांच्या हस्ते अभिषेक संपन्न भाविक भक्तांची मोठी उपस्थिती



अंबड /प्रतिनिधी

दि.८ऑक्टोबर २०२५ रोजी अंबड येथील श्री मत्स्योदरी देवी संस्थान येथे अत्यंत धार्मिक वातावरणात प्राक्षाळ पूजेनं मंदिर परिसर दुमदुमून गेला. संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांच्या शुभहस्ते देवीची अभिषेक पूजा संपन्न झाली.या पवित्र विधीप्रसंगी संस्थान विश्वस्त पुजारी गीताविलास खुंटेफळकर, संस्थान सचिव तथा नायब तहसीलदार श्री. एकनाथ भोजने, तसेच अंबड शहरातील मान्यवर पुरोहित आचार्य संतोष देवा दुधधारी व दिवाकर अण्णा जोगळादेविकर यांनी वैदिक मंत्रोच्चारांतून पूजन विधी पूर्ण केला.मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. देवीच्या अभिषेकावेळी वातावरण जय माता दी च्या घोषणांनी दुमदुमले. पूजन सोहळ्यानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.या वेळी संस्थानचे कर्मचारी नामदेव राठोड, दिगंबर खरात, अर्जुन शिंदे, गोविंद कायस्थ, दळवे दाजी, मुकेश गोसावी, श्याम परदेशी आदींनी पूजा व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेतला.

# जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत योगेश्वरी कन्याशाळेचे यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि बीड येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेच्या मुलींच्या एकोणीस वर्षाखालील गटात गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेतील दोन खेळाडूंनी यश संपादन केले .



जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत प्रेरणा मंत्री आणि अवंती लोमटे यांनी प्रथम पारितोषिक पटकावले . त्या दोघींची निवड हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय बुद्धीबळ स्पर्धेकरिता झाली आहे . खेळाडूंना मार्गदर्शन क्रीडाशिक्षिका अंजली रेवडकर यांनी केले .

विजयी खेळाडूंचे अभिनंदन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकरराव चौसाळकर , ड कल्याणी विर्धे , मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी , स्मिता धावडकर, लता सरवदे , शिक्षक प्रतिनिधी , सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी केले .

# अतिवृष्टीने धोपटेश्वर शिवारातील शेतकरी आर्थिक संकटात

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची दिपावली गोड करावी--वंचितचे दिपक खाजेकर

बदनापूर-( प्रतिनिधी) बदनापूर तालुक्यात गेल्या काही दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे धोपटेश्वर शिवारातील शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत अतिवृष्टीमुळे शेतामध्ये ओसंडून आलेल्या पाण्याने उभे पिके पाण्याखाली केले असून ते पूर्णत: नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांनी मेहनतीने पेरलेली सरकी, सोयाबीन,तुवर, ही पिके काही दिवसात काढणी योग्य तयार होणार होती, परंतु अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे सर्व स्वप्न उद्ध्वस्त केले. या घटनेमुळे शेतकऱ्यांना मोठ्या



आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे शासनाने तात्काळ पंचनामे करून व नुकसानीचा अहवाल तयार करून व ओला दुष्काळ जाहीर करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी . अशी मागणी वंचित बहूजन आघाडीचे बदनापूर तालूका महासचिव दिपक खाजेकर यांनी केली आहे.बदनापूर तहसीलदार यांच्या कडे लेखी निवेदन सादर केले असून.सततच्या पावसामुळे सोयाबीन, तुवर,मका, कापूस व भाजीपाला यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, काही ठिकाणी शेतात पाणी साचल्याने पिकांचे मुळी सडली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या नैसर्गिक आपत्तीने हिरावून घेतला आहे. नैसर्गिक आपत्तीने शेतकरी हतबल झाला असून शासनाने तातडीने मदतीसाठी पुढे यावे.अशी अपेक्षा खाजेकर यांनी व्यक्त केली आहे.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी आणि हेक्टरी ५० हजार अनुदानाची शिवसेनेची ठाम मागणी

## अंबड तहसील कार्यालयासमोर शिवसैनिकांचे धरणे आंदोलन सरकारला इशारा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर डोळेझाक सहन केली जाणार नाही

अंबड /प्रतिनिधी

दि.८ऑक्टोबर २०२५ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर अंबड तहसील कार्यालयासमोर भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी आणि अतिवृष्टीमुळे बाधित पिकांसाठी हेक्टरी ५०,००० रुपयांची मदत देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी शिवसैनिकांनी घोषणांनी तहसील कार्यालय दणाणून सोडले.शिवसैनिकांनी कर्जमाफी झालीच पाहिजे हेक्टरी ५० हजार मिळालेच पाहिजे अशा घोषणांनी सरकारला ठणकावून इशारा दिला. आंदोलनादरम्यान शासनाला दिलेल्या निवेदनात पिकविमा योजनेतील चार ट्रिगर प्रणाली पुन्हा लागू करावी तसेच घर व पशुधनासाठी वाढीव आर्थिक मदत तत्काळ द्यावी, अशी मागणी



करण्यात आली.

या आक्रमक आंदोलनाचे नेतृत्व उपजिल्हाप्रमुख हनुमानजी धांडे, मा. तालुका प्रमुख अशोक पाटील बरडे, तालुका प्रमुख दिनेश काकडे, मा. शहर प्रमुख कुमारभाऊ रुपवते, उपतालुकाप्रमुख विजय सोमाणी, कल्याण टकले, सिद्धेश्वर उबाळे, रजनीस कनके, प्रभु बामणे, अशोकराव खापे, बाबासाहेब निकम, अशोकराव गिरी, उल्हास वाघ, रमेश वराडे, भाऊसाहेब तांबे, अंनिस तांबोळी, गजानन सानप, मुकुंद हुशे, शैलेश दिवटे, शाम राठोड, अंबादास मुळे, रवि इंगळे, संदीप सदावर्ते, सुरेश राणा, महादेव लेकुरवाळे, सुनिल वाकणकर, गोरख डोखे, शिवराम भोजने, बाळासाहेब नारळे, विठ्ठल शिंदे, सिताराम विर, नाथा मिठे, कैलास खरात आदींनी केले.शेकडो शिवसैनिक व शेतकरी उपस्थित राहून सरकारविरोधात तीव्र घोषणा देत आक्रोश व्यक्त केला. आंदोलनाच्या माध्यमातून शिवसेनेने स्पष्ट केले की शेतकऱ्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला रस्त्यावर उतरून उत्तर दिले जाईल

# खा.डॉ.कल्याण काळे यांच्याकडून जालना महानगरपालिकेला विकासकामांना गती देण्याचे धडाकेबाज निर्देश

जालना /प्रतिनिधी

जालना शहराच्या विकासाला बुलेट ट्रेन च्या वेगाने गती देण्यासाठी मा.खासदार डॉ. कल्याण काळे यांनी महानगरपालिका कार्यालयात धडाकेबाज आढावा बैठक घेऊन अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. विकासकामे, पाणी, कचरा, अतिक्रमण आणि तलावांच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करत त्यांनी तत्काळ आणि समाधानकारक कार्यवाही करण्याचे अल्टिमेटम दिले आहे.



तलाव दुरुस्ती आणि पूरनियंत्रणावर मास्टरप्लॅन

शहरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या जलस्रोतांवर खासदारांनी विशेष लक्ष केंद्रित केले.घाणेवाडी तलाव शासनाकडून महानगरपालिकेकडे मालकी हस्तांतरित झालेल्या घाणेवाडी तलावातील गाळ तातडीने काढावा आणि संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मनपाच्या नावाने सातबारा उताऱ्यात इतर हक्कात नोंद झाल्याने आता मनपाला यावर तातडीने काम करण्याची संधी मिळाली आहे.

मोती तलाव व पूरनियंत्रण अतिवृष्टीमुळे झालेले मोठे नुकसान लक्षात घेता मोती तलावाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची सूचना करण्यात आली. भविष्यात पूरपरिस्थिती उद्भवू नये म्हणून मोती तलावाजवळील सांडव्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

नदीपात्र अतिक्रमण कुंडलिका आणि सीना नद्यांच्या रेड व ब्लू लाईन मार्किंगचे काम पूर्ण करून नदीपात्रातील सर्व अतिक्रमण तातडीने हटवावे असे ठोस निर्देश खासदारांनी दिले. तसेच नॅशनल हायवे अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तलावाजवळील रस्त्याची उंची वाढवण्याची सूचना केली.

अतिक्रमण हटाव मोहिम आणि मूलभूत सुविधांवर कठोर भूमिका शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी खासदारांनी अतिक्रमणाविरुद्ध कठोर भूमिका घेतली.ओपन स्पेस आणि डी.पी. रोड शहरातील ३०० हून अधिक ओपन स्पेसवरील अतिक्रमण काढून मनपाने ताबा घ्यावा आणि मनपा व झालर क्षेत्रातील डी.पी. रोडवरील अतिक्रमण त्वरित हटवावे, असे आदेश त्यांनी दिले.पथदिवे आणि पाणीपुरवठा शहरातील पथदिवे नियमित सुरू ठेवण्याची सक्त ताकीद देण्यात आली. तसेच कचरा व्यवस्थापनात सुधारणा आणि पाणीपुरवठा नियमित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.सामाजिक योजना रमाई घरकूल योजनेतील लाभार्थ्यांना निधी वेळेवर न मिळाल्याने संबंधित अभियंत्यावर कारवाई करण्याचे निर्देश खासदारांनी दिले.शुल्क कपातीची सूचना जन्म व मृत्यू नोंदणीसाठी आकारले जाणारे प्रति वर्ष १०० रुपये शुल्क कमी करण्याबाबतही त्यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले.

अधिकाऱ्यांसाठी २-३ महिन्यांचा अल्टिमेटम

बैठकीच्या शेवटी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना डेडललाईन दिली. त्यांनी स्पष्ट केले की पुढील २ ते ३ महिन्यांत पुढील आढावा बैठक आयोजित करण्यात येईल. तोपर्यंत महानगरपालिकेने सर्व समस्यांवर समाधानकारक कार्यवाही करून कामांचा अहवाल सादर करावा.

या महत्त्वपूर्ण बैठकीस जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष भास्करराव आंबेकर, तसेच कल्याण दळे, नंदाताई पवार, बंदर भाई चाऊस, संजय सेठ मुथा, राजेंद्र गोरे, नरेंद्रजी मित्तल, रऊफ भाई परसुवाले, अंकुशराव राऊत, विनोद यादव, अकबर खान, इब्राहीम शेख, सीतारामजी अग्रवाल आदी मान्यवर पदाधिकारी आणि नेते उपस्थित होते.



# स्पर्धा परीक्षा अंतर्गत करीअरच्या विविध संधी – श्रीमती स्वाती कदम

बीड /प्रतिनिधी

सौ. के.एस.के. महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा अंतर्गत करीअरच्या विविध संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन स्पर्धा परीक्षा समितीमार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ बीड येथील साठा अधिक्षक श्रीमती स्वाती कदम या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या विविध संधी, परीक्षांचे स्वरुप, यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले अभ्यासाचे नियोजन व रणनिती याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. त्याच बरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी या क्षेत्रातील उज्वल भवितव्या बद्दल मोल्यवान मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर , महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, श्री. विश्वंभर देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इरलापल्ले पल्लवी यांनी केले. सुत्रसंचालन राज्याशात्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गणेश कदम तर आभार डॉ. संजय मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. पांडूरंग केदार, श्री संजय काळे व स्पर्धा परीक्षा समिती मधील सर्वांचे सहकार्य लाभले.

# पूरग्रस्त बांधवांच्या मदतीला धावले जाफराबादकर

## जाफराबाद तालुक्यातील गावकऱ्यांच्या व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने पूरग्रस्तांना एक हजार जीवनावश्यक वस्तूंच्या किट वाटप

जाफराबाद /हरी भालके

धाराशिव व जालना जिल्ह्यातीसह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस अतिवृष्टी होऊन नदी नाल्यांना पुर येऊन नदीकाठच्या गावांना पुराचा मोठा फटका बसला या पुरात शेती, व्यवसाय आणि घरांचे प्रचंड नुकसान झाले.आणि ह्याच पूरग्रस्तांना मदत मिळावी म्हणून पूरग्रस्तांना जाफराबाद तालुक्यातून भरीव मदत करून जाफराबादकरानी सामाजिक बांधिलकी जपली. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील भोगगांव, बाणेगांव

येथे घनसांवगी येथील युवा संघर्ष समितीच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तूच्या किट वाटप करण्यात आले तर धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील पिंपळगाव को, बहुला, आडसुळवाडी, धनेश्वरी बोरगांव येथील अतिवृष्टीने बाधित कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.



यावेळी हे सर्व मदत ही जाफराबाद तालुक्यातील गावकऱ्यांनी व दानशूर व्यक्तींनी पूरग्रस्त मदत समितीकडे सुपूर्द केली ही मदत केली होती त्यात वरुड खुर्द, ,आसई, कोनड, हिवराबळी, सावरखेडा गोंधन, बोरखेडी गायके,अकोला देव, काळेगांव, हनुमंतखेडा, आळंद, बुटखेडा इत्यादी गावकऱ्यांनी पुढाकार घेऊन जमा केली होती.त्यानंतर सर्व मदत एकत्र करून समितीच्या माध्यमातून त्याची दोन तीन दिवस रात्रभर जीवनावश्यक वस्तूंच्या एक हजार किट तयार करून पूरग्रस्तांना वाटप करण्यात आली.

जाफराबाद तालुक्यातील गावकऱ्यांना व दानशूर व्यक्तींना पूरग्रस्तांना मदती साठी आवाहन केलं त्यानुसार जाफराबाद तालुक्यातील गावकऱ्यांनी व दानशूर व्यक्तींनी आवाहनाला प्रतिसाद देत वस्तू रूपाने मदत केली. तालुक्यातूनही मोठी मदत गोळा झाली. त्यातून गरजेच्या वस्तूंचे कीट तयार करण्यात आले.काही दिवस पुरेल इतकया जीवनावश्यक वस्तूंची मदत ही जाफराबाद तालुक्याच्या वतीने करण्यात आली.जाफराबाद तालुक्यातील बांधवांच्या वतीने पुरग्रस्त बांधवांसाठी बनविलेल्या जिवनावश्यक वस्तुंच्या किटचे धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील चार गावात वाटप करतांना समाज बांधव.


# सिपोरा अं जिप साठी पक्षाने संधी दिल्यास भारतीय जनता पार्टीचं झेंडा फडकवू

## निवडणुक लढण्यासाठी नगरसेवक अनिल बोर्डे इच्छुक

प्रतिनिधी : जाफराबाद

तालुक्यातील सिपोरा अं जिल्हा परिषद सर्कलची जागा अनुसूचित जातीसाठी सुटल्यास जिल्हा परिषद सर्कल मध्ये विविध विकास कामे या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपण तत्पर असून भाजपने मला या जिप सर्कलसाठी उमेदवारी दिली तर जनतेच्या विश्वासावर आपण मोठ्या मताधिक्याने निवडून येऊन या जिल्हा परिषद सर्कलचा चा सर्वांगीण विकास करू असे मत नगर सेवक अनिल रामराव बोर्डे यांनी सांगितले .

यावेळी ते म्हणाले की २००५ पासून ते २०१३ पर्यंत जाफ्राबाद येथील तहसील कार्यालय मध्ये सेतू सुविधा च्या माध्यमातून जनतेची सेवा केली आहे गेल्या अनेक वर्षांपासून या जिप सर्कल मधील नागरिकाशी माझे जिव्हाळ्याचे नाते संबंध आहे तसेच प्रत्येकाच्या सुखा दुखात मी सहभागी असतो तळागाळातील घटकापर्यंत माझ्या नात्यांची नाळ जुळलेली असून मी सर्वांना परीचित आहे तसेच शेतकरी, कामगार, कष्टकरी, वयस्क विद्यार्थी , तसेच महिला यांच्या न्याया हक्कासाठी मी लढत असून माझ्या परीने मी नागरिकांच्या अनेक समस्या



सोडविलेल्या असल्याने माझ्यावर या सर्कलमधील नागरिकांचा प्रचंड विश्वास असून सिपोरा अं या जिल्हा परिषद सर्कल ची निवडणुक मी लढावी असे या परिसरातील शेतकरी, सर्वसामान्यांची इच्छा आहे .या जिल्हा परिषद सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कट्टीबद्ध असल्याने भाजप च्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्या कार्याची दखल घेऊन माझ्यावर या सर्कलची जिम्मेदारी द्यावी व मी या जिम्मेदारीचा पुरेपूर फायदा घेऊन वरिष्ठ तथा नागरिकांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही व प्रचंड बहुमताने निवडून येऊन सिपोरा अं या जिल्हा परिषद सर्कलचे विकासाच्या बाबतीत चेहरामोहरा बदलणार असल्याचेही नगर सेवक अनिल बोर्डे म्हणाले .

### विकासात्मक दृष्टीकोन असलेल्याला संधी द्या

अनिल भाऊ बोर्डे हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व आहे अनेक वर्षांपासून मी त्यांना जवळून पाहिले अनेक लोकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन अनेक कार्यकर्त्यांचे प्रश्न मार्गी लावले आहेत पक्षाने त्यांना उमेदवारी दिल्याने ते नक्की विजयी होतील

प्रभाकर पाटील अंभोरे सिपोरा अं .

अनिल बोर्डे यांच्या माध्यमातून सिपोरा अं सर्कल मध्ये पक्षाने नवीन चेहऱ्यांना संधी द्यावी सध्या तरी सर्वात लोकप्रिय चेहरा आहे , सर्वांना सोबत घेऊन काम करायची त्यांची पद्धत आम्ही जवळून पाहिलेली आहे , भाजपा पक्षाने उमेदवारी दिली तर ते नक्की विजयी होतील

सिद्धार्थ भिसे ग्रामपंचायत सदस्य दे.झरी

अनिल भाऊ बोर्डे हे मंगरूळचे रहिवासी असून ते जाफ्राबाद या ठिकाणी सर्व जनतेच्या संपर्कात राहून जण सेवा करत आहे आणि पुढे ही करत राहील.

शुभम बोराडे, मंगरूळ.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारने जाहीर केलेलं पॅकेज म्हणजे फसवणूक – अजय पाटील बनकर

जाफराबाद /हरी भालके

अतिवृष्टीमुळे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पिकांचे, जनावरांचे तसेच घरांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारने जाहीर केलेले मदत पॅकेज हे फसव्या स्वरूपाचे



असून, शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या तुलनेत अत्यंत अपुरे आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया काँग्रेस तालुका अध्यक्ष अजय पाटील बनकर यांनी दिली आहे.

बनकर म्हणाले की,सरकारने दिलेली मदत म्हणजे केवळ ढगात वीज चमकवण्यासारखी आहे.ही मदत नाही, ही शेतकऱ्यांची थट्टा आहे!काँग्रेस पक्ष नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभा राहिला आहे. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई आणि न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस संघर्ष करत राहील, असेही अजय पाटील बनकर यांनी स्पष्ट केले.

# कॅरमपटू त्रिवेणी विष्णू तोगे हिची विभागीय स्तरावर शानदार निवड



दहिपुरीच्या कन्येचा क्रीडाक्षेत्रात चमकदार झळाळा

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे दहिपुरी सम्राट अशोक शिक्षण प्रसारक मंडळ दहिपुरी संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर दहिपुरी शाळेतील विद्यार्थिनी कुमारी त्रिवेणी विष्णू तोगे हिने आपल्या प्रतिभेच्या जोरावर जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत उत्तुंग यश संपादन करत विभागीय स्तरावर निवड मिळवण्याचा मान पटकावला आहे.ही स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. त्रिवेणीच्या अचूक निशाण्याने, शांत डावपेचांनी आणि आत्मविश्वासपूर्ण खेळीने परीक्षक व प्रेक्षकांची मने जिंकली.या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय चंद्रमणीजी खरात,सचिव अमोल भैय्या खरात,तसेच सर्व शिक्षकवृंद आणि गावकऱ्यांनी तिचा सत्कार करून अभिनंदन केले.सर्वांनी तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत सांगितले

# भागवत कथेत साजरे झाला भगवान श्रीकृष्ण - रुक्मीणी स्वयंवर विवाह सोहळा

## जयसिंग पंडित यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती





गेवराई (प्रतिनिधी) माजीमंत्री शिवाजीराव (दादा)पंडित यांच्या ८८व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेत आज भगवान श्रीकृष्ण - रुक्मीणी स्वयंवर सोहळा संपन्न झाला. भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधूर वाणीतून उपस्थितांना भागवत कथा कथन करुन वातावरणात चैतन्य निर्माण केले. यावेळी शिवशारदा मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांच्यासह साधुसंत, अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, महिला पुरुष भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराईत शिवनगरीत सुरु असलेल्या भागवत कथेत समाधान महाराज शर्मा यांनी सातवे पुष्प गुंफले. यावेळी त्यांनी भगवान श्रीकृष्णची रासलीला कथन केली. यावेळी उपस्थित भाविक भक्तांनी आनंद साजरा केला. आजच्या कथेत भगवान श्रीकृष्ण - रुक्मीणी विवाह सोहळा उपस्थित हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. यावेळी उपस्थित भाविक भक्तांनी नाचून आणि फुगड्या खेळून आनंद साजरा केला. यावेळी जयसिंग पंडित आणि समाधान महाराज शर्मा हेही नाचत आणि फुगड्या खेळत या आनंदात सहभागी झाले. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या भागवत कथेस भाविक भक्तांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

समाधान महाराज शर्मा यांच्या गाडीच्या चालकाचेही झाला शुभमंगल

भागवत कथेत भगवान श्रीकृष्ण रुक्मीणी स्वयंवर संपन्न झाल्यानंतर उपस्थित भाविक भक्तांच्या साक्षिने आणि साधुसंतांच्या उपस्थितीत भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांच्या गाडीचा चालक कृष्णा यांचा याप्रसंगी विवाह सोहळा संपन्न झाला. केशव धोंडिबा खेडकर चकलंबा यांचे सुपुत्र चि. कृष्णा आणि विजय निवृत्ती पालवे अहिल्यानगर यांची सुकन्या चि.सो.का. भक्ती यांचे शुभमंगल यावेळी झाले.

# आ. प्रकाश सोळंके यांनी केला राम निपटे यांचा सत्कार



वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी मोठे मोलाचे योगदान ठरलेले श्रावणी झेरॉक्स चे राम निपटे यांचा माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी यथोचित सत्कार केला.

सविस्तर वृत्त असे की तालुक्यात फिरते श्रावणी झेरॉक्स सेंटरच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक गावा गावात वाडी वस्त्यावर जाऊन राम निपटे यांनी कुणबी नोंदी आणि कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी केली.ज्यांचे कुणबी यादीमध्ये नाव आहे.त्यांची संपूर्ण वंशावळ जुळवून देण्यासाठी लागणारे शासकीय कागदपत्रे स्वत: मेहनत घेऊन कुणबी प्रमाणपत्र काढण्यास मोठे सहकार्य केले.तालुक्यातून सर्वात जास्त अल्प दरात प्रमाणपत्र काडुन दिल्याबद्दल माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्यांना यथोचित सत्कार करून सन्मानित केले.यावेळी चेअरमन श्रीनिवास निपटे,बळीराम महाराज निपटे,सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष माधव काका शेंडगे,मा सरपंच लखन महागोविंद,विलास निपटे अदी उपस्थित होते.

# व्यंकटेश गणेश मंडळ आयोजित दांडिया स्पर्धेचे बक्षीस वितरण

## नारी अबला नाही, तर सबलाच - डॉ.राजेश इंगोले




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

व्यंकटेश गणेश मंडळ आयोजित दांडिया स्पर्धेचे बक्षीस वितरण नुकतेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, नारी ही अबला नसून सबलाच आहे. परंपरावादी व्यवस्थेने दुर्दैवाने महिलांना दुय्यम दर्जा दिला आणि कधी काळी मातृसत्ताक कुटुंब पद्धती असलेल्या भारतामध्ये स्त्रियांना गुलाम म्हणून जगावे लागले. स्त्रियांकडे फक्त चूल आणि मूल याच्या उपयोगितेच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले आणि हे चित्र बदलण्यासाठी देशातील विविध महापुरूषांनी महामातांनी स्त्रियांना या पारंपारिक गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी एल्गार केला आणि आज या देशातली नारी विविध उच्चपदस्थ पदांवर अधिकारी म्हणून दिसत आहे. पंतप्रधान, राष्ट्रपती, आमदार, खासदार, मंत्री, जिल्हाधिकारी, न्यायाधीश, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनीयर म्हणून दिसत आहेत. यामागे प्रेरणा केवळ या महापुरूषांचीच आहे. परंपरेने जरी स्त्रीला गुलाम बनवलं तरी स्त्री ही गुलाम नाही. ती सर्जक आहे. ती या सृष्टीची निर्माती आहे. ती या सृष्टीवर नवीन जीवन तयार करण्याच्या ताकदीची आहे. योग्य तिची आहे. निसर्गाने सुद्धा मातृत्वाची ताकद फक्त स्त्रीला दिली. त्यामुळे स्त्री ही खऱ्या अर्थाने आदिशक्ती आहे. या सृष्टीची जननी आहे असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी व्यंकटेश गणेश मंडळ मंडीचा राजा व ॲड.किरण भालेकर मित्र मंडळातर्फे आयोजित दांडिया महोत्सवात पारितोषिक वितरण करताना प्रमुख पाहुणे म्हणून केले. यावेळी व्यासपीठावर सुप्रसिद्ध विधीज्ञ ॲड.अजित बापू लोमटे, ॲड.प्रदीप दहिवाळ, श्रीकांत धायगुडे, दांडिया महोत्सवाचे अध्यक्ष पुष्पा भालेकर, ॲड.किरण भालेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्त्रियांची विविध रूपे असतात. त्यामध्ये आई असते बहीण असते, पत्नी असते, प्रेयसी असते, मुलगी असते ही सर्व नाती प्रेमाची आणि ममत्वाची असतात. ज्या देशांमध्ये स्त्री ही शिक्षित असते स्त्रीला हा सन्मानाचा दर्जा दिला जातो तो देश महासत्ता बनत असतो त्यामुळे नारीला समानतेचा दर्जा दिला गेला पाहिजे नारी ही अबोला नसून ती सबल आहे तिला फक्त योग्य संधी दिली गेली पाहिजे असे वक्तव्य डॉ.इंगोले यांनी केले. यावेळी दांडिया महोत्सवात घेतलेल्या दांडिया स्पर्धेचे व खेळ पैठणीचा या स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# आंतरभारतीचा कार्यकर्ता पुरस्कार यंदाचे मानकरी सिद्धेश्वर स्वामी




अंबाजोगाई /प्रतिनिधी :-- आंतरभारती, आंबाजोगाईच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार यंदा सिद्धेश्वर स्वामी यांना जाहीर करण्यात आला.

सिद्धेश्वर स्वामी हे गेली अनेक वर्षे वकील संघाचे काम करतात. हे करीत असताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. स्वतःची आर्थिक परिस्थिती बेताची अशनही ते अनेकांच्या मदतीला धावून जातात.

आंतरभारतीच्या आधुनिक तीर्थक्षेत्राना भेटी देण्याच्या अभिनव कार्यक्रमात सहभागी झाले. त्यांनी पाळी येथील दत्ता बारगजे यांच्या प्रकल्पाला भेट दिली. अनाथ, विधवा व दुर्धर आजाराने ग्रस्त असणाऱ्या लेकरांचे हे मोठे आश्रयस्थान आहे. तेथे स्थानिक मुलामुलींसोबत सहभोजन केले. त्यांना या संस्थेचा दूत म्हणून नियुक्त केल्यानंतर त्यांनी झपाटून कार्य केले. कपडे व भाजीपाला तर अनेकदा पाठवला. त्याच बरोबर आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने आर्थिक मदतीचे त्यांनी आवाहन केले. त्यातून जमा झालेंक्या रकमेत आपलयाकडून काही रकमेची भर घालून ते पैसे त्यांनी इंफॅन्ट इंडियाच्या खात्यावर जमा केले. आंबाजोगाईतील सेवाभावी कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

सिद्धेश्वर स्वामी उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार १२ ऑक्टोबर रोजी डॉ शिरीष खेडगिकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम आधार मल्टिस्टेटच्या अजिंठा सभागृहात सायं ठीक ५ वाजता होईल.

# सचिन दादा नेहरकर यांचा वाढदिवस औक्षण करून साजरा



केज/प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कुटुंब प्रबोधन विभागातर्फे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त केज येथे दिनांक ६ ऑक्टोबर रोजी एक भव्य कौटुंबिक एकत्रीकरण कार्यक्रम संपन्न झाला.रात्री ८ ते १२ यावेळेत स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास परिसरातील तब्बल ३० कुटुंबांसह स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बौद्धिकने झाली. त्यानंतर कुटुंब प्रबोधन विभागाचे प्रांत सहप्रमुख श्री.महेश माणिकराव आनंदगावकर यांनी सध्याच्या धकाधकीच्या जीवनात एकत्र कुटुंब पद्धतीचेमहत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी विविध सांघिक खेळांचे आयोजन करण्यात आले.लहानग्यां पासून वृद्धांपर्यंत सर्वांनी मैदानावर खेळ खेळून एक वेगळाच आनंद लुटला.यानंतर कोजागिरी पौर्णिमा साजरी करत दूध प्राशन व अल्पोपहार घेऊन उपस्थितांनी रात्रीचा आस्वाद घेतला.

कार्यक्रमात आणखी एक खास आकर्षण ठरले ते म्हणजे संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सचिन दादा नेहरकर यांचा वाढदिवस. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही सौ.अनुराधा नेहरकर यांच्या हस्ते औक्षण करून सचिन दादांचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानंतर उपस्थितांनी केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संघाचे स्थानिक कार्यकर्ते, कुटुंब प्रबोधन विभागाचे स्वयंसेवक आणि सहभागी कुटुंबांचे विशेष योगदान लाभले.

# धारूरच्या विकासासाठी नवा चेहरा हवा! उच्चशिक्षित, समाजभान असलेले सूर्यकांत जगताप नगराध्यक्षपदाचे प्रबळ दावेदार



धारूर: किल्ले-धारूर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीमुळे शहरातील राजकारण ढवळून निघाले आहे. आरक्षणाची स्थिती आणि नगराध्यक्षपदाची संभाव्य समीकरणे यामुळे सध्या धारूर शहरामध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. प्रभागातील आरक्षणामुळे अनेक इच्छुकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले असले, तरी दुसरीकडे नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी मात्र एका नव्या आणि प्रभावी नावाभोवती एकमत होताना दिसत आहे.

राजकीय अनुभवी विरुद्ध सुशिक्षित समाजसेवक

सध्या नगराध्यक्षपदासाठी अनेक राजकीय पार्श्वभूमी असलेले आणि दीर्घकाळ राजकारणात योगदान दिलेले चेहरे सक्रिय आहेत. मात्र, गेली अनेक वर्षे निवडून आलेल्या नेत्यांनी आणि विविध पक्षांनी शहराच्या विकासाकडे केलेल्या दुर्लक्षामुळे धारूरची जी दुरवस्था झाली आहे, ती पाहता, आता शहराला एका उच्चशिक्षित, तळमळीच्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या नेतृत्वाची गरज असल्याची तीव्र भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

यातूनच, गेल्या १५ ते २० वर्षांपासून धारूर शहर आणि तालुक्यामध्ये सातत्याने समाजकार्य करत असलेले, विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या माध्यमातून आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे श्री. सूर्यकांत जगताप यांचे नाव नगराध्यक्षपदासाठी आग्रहाने पुढे येत आहे.

सूर्यकांत जगताप: विकासपर्वाचा नवा अध्याय

श्री. सूर्यकांत जगताप हे केवळ उच्चशिक्षित नाहीत, तर त्यांनी सामाजिक बांधिलकीची पदवी घेऊन आपले संपूर्ण जीवन समाजसेवेसाठी समर्पित केले आहे. राजकीय क्षेत्रातील थेट सहभाग नसतानाही, त्यांनी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून धारूरच्या जनतेला मदतीचा हात दिला आहे.

जनतेची मागणी आहे की, जर सूर्यकांत जगताप यांच्यासारख्या उच्चशिक्षित, सामाजिक जाणीव असलेल्या आणि सकारात्मक विचारांच्या व्यक्तीला नगराध्यक्षपदाची संधी मिळाली, तर धारूर शहरात खऱ्या अर्थाने विकासात्मक बदल घडेल.

* विकासाभिमुख दृष्टीकोन: जगताप यांच्याकडे असलेले उच्च शिक्षण आणि सामाजिक कामाचा अनुभव यामुळे ते शहराच्या समस्यांचे मूळ ओळखून, शाश्वत विकासाचे नियोजन करू शकतात.

* पारदर्शक कारभार: कोणताही राजकीय गट किंवा दबाव नसलेल्या या सामाजिक नेत्याकडून, पारदर्शक आणि प्रामाणिक कारभाराची अपेक्षा नागरिकांना आहे.

* ऐतिहासिक धारूरला न्याय: गेल्या अनेक वर्षांपासून विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या धारूर शहराला, एक सामाजिक दृष्टीकोन असलेला नगराध्यक्ष मिळाल्यास, या ऐतिहासिक शहराला राज्याच्या नकाशावर एक वेगळे स्थान मिळवून देण्यास मदत होईल.

'सर्वांना बाजूला सारून जगताप यांना संधी द्या'

धारूरच्या नागरिकांचे स्पष्ट मत आहे की, यापूर्वी निवडून आलेल्या प्रतिनिधींनी शहराच्या मूलभूत गरजांकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. रस्ते, पाणी, आणि स्वच्छतेच्या समस्या आजही कायम आहेत. ही अवस्था बदलण्यासाठी आता राजकीय समीकरणे बाजूला सारून, जनसामान्यांमध्ये मिसळून काम करणाऱ्या सूर्यकांत जगताप यांना नगराध्यक्षपदासाठी सर्वसामान्य नागरिकांनी एकमताने पाठिंबा द्यावा.

उच्चशिक्षण, सामाजिक कार्याचा दांडगा अनुभव आणि धारूरच्या विकासाची तळमळ असलेले श्री. सूर्यकांत जगताप यांच्यासारखे नेतृत्व नगराध्यक्ष झाले, तरच किल्ले-धारूर हे खऱ्या अर्थाने विकासपथावर अग्रेसर होईल, असा विश्वास शहरवासीयांनी व्यक्त केला आहे.

# सुनीलजी हिरवे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आ. गटात असंख्य कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश

केज/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदासजी आठवले यांचे अत्यंत विश्वासू संदिपान तात्या हजारे यांच्या नेतृत्वामुळे आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची ताकद जिल्ह्यात अधिकच वाढते आहे.केज तालुक्यामध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे केज तालुकाध्यक्ष सुनीलजी हिरवे यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे.याविषयी सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यामध्ये आगामी काळातील निवडणुकांचा विचार करता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते तथा केजचे तालुकाध्यक्ष सुनीलजी हिरवे यांच्या भक्कम व उत्कृष्ट नेतृत्वा खाली दि.०७/१०/२०२५ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया संपर्क कार्यालय केज येथे असंख्य तरुण कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.सुनीलजी हिरवे यांची बहुजन समाजाविषयी,समाजातील तळागाळातील व्यक्तींविषयी,त्यांच्या प्रश्नाविषयीची आस्था, मागास-अतीमागास, वंचित व अल्पसंख्याक घटकांसाठी,अन्यायग्रस्तां साठीची तळमळ लक्षात घेऊन त्यांच्यासोबत काम करण्याची जिद्द व आकर्षण तरुणाईला असल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदीप तात्या हजारे यांच्यानेतृत्वाखाली व राष्ट्रीय नेते रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष सुनील हिरवे मराठा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नवनाथजी तपसे,अंगद शिनगारे, अमोल मस्के यावेळी उपस्थित होते.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये सुरज हजारे,आनंद शिनगारे,सुमित मस्के, निलेश मस्के,मंगेशसरवदे, अजय मस्के,संतोष गायकवाड,नितीन मस्के, प्रेम हजारे इत्यादी तरुण कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला आहे.

# विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत सिद्धेश्वर महाविद्यालयाचे सुयश



माजलगाव /प्रतिनिधी : भा.शि. प्र.संस्थेच्या येथील सिद्धेश्वर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाने विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत रसायनशास्त्र विभागातील प्रा. अक्षय जगताप यांनी प्राध्यापक संशोधकांमधून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर या विभागाची विद्यार्थिनी मोहिनी चंद्रशेखर पायघन हिने रसायनशास्त्र विभागातील प्रा. अक्षय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हायब्रीड रिनीव्हेबल चार्जिंग स्टेशन्स पावर्ड बाय स्मार्ट एनर्जी पोल्स फॉर झिरो कार्बन इमिशन या विषयावरती हा प्रकल्प सादर केला. संशोधन क्षेत्रातील नाविन्यामुळे या सादरीकरणास कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन या विद्यार्थिनीस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास बोरगावकर, डॉ. संजय पवार यांनी योग्य दिशा दाखवत संशोधन वृत्ती विकसित केली. प्रा अक्षय जगताप आणि कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन या दोघांचेही अभिनंदन भा.शि. प्र.संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष ज्योतीताई ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, स्थानिक कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेमधून प्रा. अक्षय जगताप व कु. मोहिनी पायघन हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

# भारताचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा पाटोदा वकील संघाकडून तीव्र निषेध



पाटोदा/प्रतिनिधी

भारताचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर एका व्यक्तीकडून झालेल्या भ्याड हल्ल्याचा पाटोदा तालुका वकील संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर रोजी वकील संघाच्या सदस्यांनी काळी फीत बांधून निषेध व्यक्त केला.

या वेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲडव्होकेट बी. आर. लवूळ, सचिव ॲडव्होकेट विलास पवार, उपाध्यक्ष ॲडव्होकेट जब्बार पठाण, ॲडव्होकेट विशाल मस्के, ॲडव्होकेट डी. एम. पारगावकर, ॲडव्होकेट एम. व्ही. जाधव, ॲडव्होकेट सचिन जावळे, ॲडव्होकेट श्वेता राख, ॲडव्होकेट पुनम शहाणे, ॲडव्होकेट बी. बी. जावळे, ॲडव्होकेट ऋषिकेश डबीर, ॲडव्होकेट बी. डी. तळेकर, ॲडव्होकेट एस. एन. घुमरे, ॲडव्होकेट रवींद्र आवटे, ॲडव्होकेट एस. पी. कोकाटे, ॲडव्होकेट एन. जी. जाधव, ॲडव्होकेट अजित थोरवे, ॲडव्होकेट चंदन कांकरिया, एडवोकेट अमरीश वैद्य ॲडव्होकेट सिताराम नागरगोजे, ॲडव्होकेट अविनाश जगदाळे, ॲडव्होकेट शिवाजी कोल्हे, ॲडव्होकेट घूले, तसेच ॲडव्होकेट महेश बेदरे आदी सर्व वकील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व वकील संघ सदस्यांनी या प्रसंगी भारताचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत न्यायव्यवस्थेवरील विश्वास अबाधित ठेवण्याचे आवाहन केले.

## शेतकऱ्यांच्या विविध न्याय मागण्या संदर्भात लोह्यात हंबरडा मोर्चाच्या अनुषंगाने

# लोहा तहसिलवर शिवसेनेचे ढोल वाजवुन धरणे आंदोलन



लोहा /प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात लोह्यात हंबरडा मोर्चाच्या अनुषंगाने लोहा तहसिलवर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा लोहा पं. स.चे माजी सभापती सतीश पाटील उमरेकर यांच्या नेतृत्वाखाली ढोल वाजवुन एकदिवसीय धरणे आंदोलन करून लोहा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

पुढे निवेदनात असे नमूद केले की,लोहा व कंधार तालुक्यांसह संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी व पुरामुळे कोरडवाहू शेती, हंगामी बागायती शेती व पुरामुळे खरडुन गेलेल्या जमिनीसाठी शासनाने वेगवेगळ्या शर्ती,निकष ,अटी लावुन तटपुंजी आर्थिक मदत जाहीर करुन शेतकऱ्यांची थट्टाच केली.त्यामुळे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांना न्याय हक्क मिळवून देण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हंबरडा मोर्चाचे आयोजन केले आहे.

त्याअनुषंगाने आम्ही शिवसेनेच्या वतीने धरणे आंदोलनाच्या माध्यमातून शासनाकडे शेतकऱ्यांच्या खालील मागण्यांसाठी लोहा तहसिल कार्यालयावर धरणे आंदोलन करीत आहोत. शिवसेनेच्या वतीने शेतकऱ्यांना न्याय हक्कासाठी केलेल्या शासनाकडे मागण्या केल्या आहेत यात लोहा व कंधार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा , कोणतेही निकष न लावता अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, वाहुन गेलेल्या गुराढोराची १०० टक्के नुकसान भरपाई द्यावी, पडझड झालेल्या घराची १०० टक्के नुकसान भरपाई द्यावी, पुरात वाहून गेलेल्या मृत व्यक्तीच्या कुटुंबाला १० लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी,नदी काठच्या खरडुन गेलेल्या जमिनीसाठी १०० टक्के अनुदान द्यावे,मागील काळातील पिकविम्याची थकित रक्कम तात्काळ द्यावी, बॅंका व प्रायव्हेट फायनन्सची वसुली तात्काळ थांबवावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे या मागण्या करुन शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा लोहा पंचायत समितीचे माजी सभापती सतीश पाटील उमरेकर, माजी पंचायत समिती सदस्य तथा सिनेट सदस्य नवनाथ उर्फ बापू चव्हाण, शिवसेनेचे जिल्हा संघटक सुरेश पाटील हिलाल,शिवसेना लोहा -कंधार विधानसभा प्रमुख वसंत पाटील शिंदे, शिवसेनेचे लोहा तालुकाप्रमुख (उत्तर)बालाजी गाडेकर, शिवसेना तालुकाप्रमुख (दक्षिण) भीमराव पाटील शिंदे, शिवसेनेचे नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, उपतालुकाप्रमुख धुराजी पाटील नावंदे,शिवसेना लोहा शहरप्रमुख खंडू पाटील पवार, शिवसेना कंधार तालुकाप्रमुख साईनाथ पाटील कदम, भागवत उदगीर , गजानन मुरुडकर,रहिम पटेल, तुळशीराम पाटील लुंगारे,अकबर सय्यद, परमेश्वर घोरपडे, अकबर सय्यद, अविनाश पवार, त्र्यंबक गोरकटे,यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अशोक नगर मुखेड येथे

# महर्षी वाल्मीकी जयंती साजरी

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड आद्यकवि महर्षी वाल्मीकी ऋषी जयंती वाल्मीकी चौक ( अशोक नगर ) याठीकाणी वाल्मीकी प्रतिमेस संजय यलमवाड यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात येऊन मारोती मामा फस्कुलवाड व भारत गव्हाणकर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.यावेळी,हणमंत नारनाळीकर,सुधाकरराव नागरवाड,जय सर जोशि,संजय पिल्लेवाड,राम बद्देवाड,शिवा बद्देवाड,संजय कामजे,जयप्रकाश कानगुले,ईमराण पठाण,केतन मामडे,बंटी सोनकांबळे,ईरफान मोमीन,बालाजी साबणे,दत्ता मरेवाड,सुनिल पाटील आरगीळे,श्रीराम बद्देवाड,माधव बद्देवाड ,सोडेवाड,सोनकांबळे भगवान,विकास वाघमारे सह समाजबांधव व मित्र परिवार उपस्थित होता.महर्षी वाल्मीकी ऋषी जयंती ध्वजारोहन यशस्वीरीत्या संपन्न होण्यासाठी अशोक नगर मित्रमंडळाचे राहुल बद्देवाड व बाळु मामीलवाड यांनी प्रयत्न केले व हणमंत नारनाळीकर यांनी सर्व समाज बांधवांचे आभार मानले.




## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात ९३ वा भारतीय वायुसेना दिन उत्साहात साजरा

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुक्रमाबाद येथे स्वामी विवेकानंद महाविद्यालयात सैनिकी विज्ञान विभागातर्फे ८ ऑक्टोबर हा भारतीय वायुसेना स्थापना दिवस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक जी. इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ.आर .एम. बिडवे उपस्थित होते .तर प्रमुख वक्ते शिवाजी कॉलेज, मुक्रमाबाद येथील भूगोल विभागाचे प्रमुख प्रा. गंगाधर वाघमारे तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस एल सकनुरे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात प्रमुख वक्त्यांनी भारतीय वायुसेनेचा ८ ऑक्टोबर हा स्थापना दिवस का साजरा केला जातो याविषयी माहिती दिली. तसेच भारतीय वायुसेनेचे युद्ध व शांतता काळातील योगदान याविषयी विशेष उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सैनिकी विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आर .बी .बाविस्कर यांनी केले. तर आभार प्रा. बी .डब्ल्यू. बाळबुधे यांनी मानले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्राध्यापक डॉ. मा.म गायकवाड तसेच डॉ. आर .बी . मादळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी सेवक बालाजी साद गिरे यांनी

# धर्माबाद नगरपालिका प्रभाग निहाय

# आरक्षण सोडत संपन्न!

धर्माबाद( अशोक पडोळे )- धर्माबाद नगरपालिका निवडणूक २०२५च्या पार्श्वभूमीवर शासनाच्या आदेशानुसार आज माहेश्वरी भवन येथे नगरपालिका प्रभाग निहाय आरक्षण सोडत संपन्न झाली.

उपजिल्हाधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे व नगरपालिका निवडणूक विभागाचे सर्व कर्मचारी सदरील प्रक्रियेत सहभागी जागी होते.

यावेळी नगरसेवकांची स्वप्न बघणाऱ्या शेकडो नागरिकांनी माहेश्वरी भवना मध्ये गर्दी केली.

उपरोक्त सोडतीनंतर नगराध्यक्ष हे पद महिलेलाच सुटल्यामुळे धर्माबाद नगरपालिकेत आगामी निवडणुकीत तब्बल १२ महिला नगरसेवक म्हणून दिसणार असून प्रत्येक जातीनिहाय आरक्षणात जे सर्वसाधारण प्रभाग सुटले आहे त्यामधूनही महिला निवडून येऊ शकतात व ही संख्या वाढू शकते.

धर्माबाद नगरपालिकेच्या प्रभागाची संख्या एकूण ११ असून २२नगरसेवक निवडून येणार आहेत. प्रत्येक प्रभागात दोन नगरसेवक निवडून येतील.

त्यापैकी प्रभाग क्रमांक एक 'अ' अनुसूचित जाती महिलाला सुटले असून प्रभाग क्रमांक एक 'ब' हा खुला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित झालेला आहे. प्रभाग क्रमांक दोन 'अ,नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण गटाला सुटले असून दोन ब हा खुला महिलासाठी राहणार आहे. प्रभाग क्रमांक तीन 'अ, नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण गटाला तर तीन 'ब, खुला असून महिलासाठी आरक्षित झालेला आहे.

प्रभाग क्रमांक चार 'अ'अनुसूचित जाती सर्वसाधारण गटाला सुटला असून प्रभाग क्रमांक चार 'ब' हा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित झाला आहे. प्रभाग क्रमांक पाच 'अ' हा अनुसूचित जाती सर्वसाधारण गटासाठी सुटला असून प्रभाग क्रमांक पाच 'ब' हा खुला महिलांसाठी आरक्षित झाला आहे. प्रभाग क्रमांक सहा'अ' हा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित झाला असून सहा 'ब' हा खुला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित झाला आहे. प्रभाग क्रमांक सात'अ' हा अनुसूचित जमाती सर्वसाधारण म्हणून आरक्षित असून सात 'ब' हा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित झाला आहे. प्रभाग क्रमांक आठ 'अ' हा नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण गटासाठी सुटला असून आठ 'ब' हा खुला महिलांसाठी राहणार आहे. प्रभाग क्रमांक ९'अ, हा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाला असून प्रभाग क्रमांक ९ 'ब' हा खुला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित ठरला आहे. प्रभाग क्रमांक दहा 'अ' हा अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव झाला असून दहा 'ब' हा खुला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित झाला आहे. प्रभाग क्रमांक ११ हा अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव झाला असून अकरा 'ब' हा खुला सर्वसाधारण गटासाठी सुटला आहे. एकूणच सर्व उपस्थितां समोर मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे व उपजिल्हाधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे यांनी आरक्षणासंदर्भात शासनाचे सर्व नियम व निकष अगोदर समजावून सांगितले. लोकसंख्येच्या आधारे कशा पद्धतीने उतरत्या क्रमांकावर आरक्षण केल्या जाते हे पण समजावून सांगितले. नंतर इयत्ता दुसरी व तिसरीत शिकणाऱ्या अतिशय लहान मुलींच्या हस्ते आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या काढण्यात आल्या. हे आरक्षण अतिशय पारदर्शक स्वरूपात झाल्यामुळे आतापर्यंत एकही तक्रार आरक्षणासंदर्भात प्राप्त झाली नाही.

# देगलूर येथे शिवसेनेचे

# शेतकरी आंदोलन संपन्न



**कर्जमाफी, हेक्टरी ५० हजार अनुदान आणि पीकविमा मंजुरीसाठी तहसील कार्यालयासमोर निदर्शने**

देगलूर, प्रतिनिधी

देगलूर : माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार, मराठवाडा संपर्कप्रमुख व माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हा प्रमुख भुजंग पाटील, तसेच सहसंपर्क प्रमुख दयाल गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर येथे ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, पीककर्ज माफ करावे व पीकविमा मंजूर करावा या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर आज, ८ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर शिवसेनेच्या वतीने निदर्शने करण्यात आली. तहसीलदार भरत सूर्यवंशी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत तीव्र संताप व्यक्त केला.

या आंदोलनावेळी उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, शहरप्रमुख संजय जोशी, विधानसभा प्रमुख पांडुरंग पाटील, जिल्हा समन्वयक नागनाथ वाडेकर, शहर संघटक भगवान जाधव, युवासेना तालुकाप्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, उपशहरप्रमुख बाबुराव मिनकीकर, युवा शहर संघटक संतोष कांबळे, विभागप्रमुख सुभाष खुनेवाड माळेगावकर यांच्यासह शिवसेना, युवासेना पदाधिकारी, शेतकरी, शिवसैनिक आणि युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जाहूर ता. मुखेड येथे महर्षी वाल्मिकी ऋषी जयंती साजरी करण्यात आली. (छाया मनोज बिरादार)

# धर्माबाद नगरपरिषदेचे नगरसेवक पदाचे आरक्षण सोडत जाहीर




धर्माबाद :( अशोक पडोळे ) नगरपरिषद् निवडणूक २०२५ साठी आरक्षण सोडत कार्यक्रम बुधवारी दि. ८ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयात पार पडले आहे.या सोडतीत नगराध्यक्ष पदासाठी खुल्या प्रवर्ग महिलेसाठी हे आरक्षण निश्चित झाले असून, एकूण बारा प्रभागांमध्ये सदस्य पदाचे आरक्षण खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आले आहे.

प्रभाग क्र. १ (अ) - अनुसूचित जाती (महिला) प्रभाग क्र. १ (ब) - खुला सर्व साधारण प्रभाग क्र. २ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग सर्व साधारण प्रभाग क्र. २ (ब) - खुला महिला प्रभाग क्र. ३ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग सर्व साधारण प्रभाग क्र. ३ (ब) - खुला महिला प्रभाग क्र. ४ (अ) - अनुसूचित जाती सर्व साधारण प्रभाग क्र. ४ (ब) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला प्रभाग क्र. ५ (अ) - अनुसूचित जाती सर्व साधारण प्रभाग क्र. ५ (ब) - खुला महिला प्रभाग क्र. ६ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला प्रभाग क्र. ६ (ब) - खुला सर्व साधारण प्रभाग क्र. ७ (अ) - अनुसूचित जमाती सर्व साधारण प्रभाग क्र. ७ (ब) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला प्रभाग क्र. ८ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग सर्व साधारण प्रभाग क्र. ८ (ब) - खुला (महिला) प्रभाग क्र. ९ (अ) - अनुसूचित जाती महिला प्रभाग क्र. ९ (ब) - खुला सर्व साधारण प्रभाग क्र. १० (अ) - अनुसूचित जमाती महिला प्रभाग क्र. १० (ब) - खुला सर्व साधारण प्रभाग क्र. ११ (अ) - अनुसूचित जमाती महिला प्रभाग क्र. ११ (ब) - खुला सर्व साधारण या सोडतीदरम्यान सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण प्रक्रियेनंतर धर्माबाद शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, विविध प्रभागांतून संभाव्य उमेदवारांचे हालचाली सुरू झाल्या आहेत.

नगराध्यक्षपदासाठी खुल्या प्रवासासाठी महिला आरक्षण सुटल्याने शहरातील महिला नेतृत्वासाठी नवी संधी उपलब्ध झाली असून,निवडणुकीची रंगत आणखी वाढण्याची शक्यता

# देगलूर नगरपरिषद निवडणूक २०२५ : नगराध्यक्षपद जइउ (महिला) साठी राखीव - तेरा प्रभागांचे आरक्षण जाहीर

देगलूर / प्रतिनिधी

देगलूर नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी आरक्षण सोडत कार्यक्रम बुधवारी (दि. ८ ऑक्टोबर) देगलूर नगरपरिषद कार्यालयात पार पडला. या सोडतीस उपजिल्हाधिकारी अनुप पाटील व देगलूर नगरपरिषद मुख्याधिकारी मीनल कांबळे यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आली. या सोडतीत नगराध्यक्षपदासाठी इतर मागास प्रवर्ग (महिला) हे आरक्षण निश्चित झाले असून, तेरा प्रभागांमधील सदस्यपदांचे आरक्षण खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आले आहे.

प्रभागनिहाय आरक्षण तपशील :

प्रभाग क्र. १ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (पुरुष)

प्रभाग क्र. १ (ब) - खुला (महिला)

प्रभाग क्र. २ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग (महिला)

प्रभाग क्र. २ (ब) - खुला

प्रभाग क्र. ३ (अ) - अनुसूचित जाती (महिला)

प्रभाग क्र. ३ (ब) - खुला

प्रभाग क्र. ४ (अ) - अनुसूचित जाती

प्रभाग क्र. ४ (ब) - खुला (महिला)

प्रभाग क्र. ५ (अ) - अनुसूचित जमाती (महिला)

प्रभाग क्र. ५ (ब) - खुला

प्रभाग क्र. ६ (अ) - अनुसूचित जमाती

प्रभाग क्र. ६ (ब) - खुला (महिला)

प्रभाग क्र. ७ (अ) - अनुसूचित जाती (महिला)

प्रभाग क्र. ७ (ब) - खुला

प्रभाग क्र. ८ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग

प्रभाग क्र. ८ (ब) - खुला (महिला)

प्रभाग क्र. ९ (अ) - खुला (महिला)

प्रभाग क्र. ९ (ब) - खुला

प्रभाग क्र. १० (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग (महिला)

प्रभाग क्र. १० (ब) - खुला

प्रभाग क्र. ११ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग

प्रभाग क्र. ११ (ब) - खुला (महिला)

प्रभाग क्र. १२ (अ) - अनुसूचित जाती

प्रभाग क्र. १२ (ब) - नागरिकांच्या मागास



प्रवर्ग (महिला)

(क) (खुला) महिला

प्रभाग क्र. १३ (अ) - नागरिकांच्या मागास प्रवर्ग (महिला )

प्रभाग क्र. १३ (ब) - खुला

या आरक्षण सोडतीदरम्यान सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या आरक्षणामुळे राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी जइउ (महिला) आरक्षण ठरल्यानंतर देगलूरच्या महिला नेतृत्वाला नवसंजीवनी मिळाली असून, येत्या निवडणुकीची रंगत चांगलीच वाढण्याची शक्यता आहे.